K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur,
Kamod Road,
Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR

Physioflex.
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid,
Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2,
Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५४ वे, अंक ४
Year : 54, Issue No. : 4

नाशिक, शुक्रवार दि. ८ मे २०२६
Nashik, Friday 8 May 2026

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

# लग्नाचे आमिष दाखवून फेसबुक फ्रेंडने केला घटस्फोटीत महिलेवर ५ वर्षे लैंगिक अत्याचार

## १४ तोळे सोन्यासह साडेचार लाखांची रोकडही लुबाडली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- फेसबुकच्या माध्यमातून मैत्री करुन लग्नाचे आमिष दाखवून घटस्फोटीत महिलेवर ५ वर्षे लैंगिक अत्याचार करून तिच्याकडील १४ तोळे दागिने व साडेचार लाख रुपयांचा अपहार करुन लग्नास नकार देणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यता आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिलेचा घटस्फोट झाला असून, ती सध्या इंदिरानगर परिसरात रहाते. आरोपी तौसिफ वसियोद्दीन सैय्यद (पिरजादे) (वय ४०, रा. सादीक अपार्टमेंट, पिंजारघाट, जुने नाशिक) याने फिर्यादी महिलेशी फेसबुकच्या माध्यमातून ओळख निर्माण केली. त्यानंतर तिचा विश्वास संपादन करून तिला लग्नाचे आमिष दाखवले. सन २०२० ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत आरोपी पिरजादे याने पिडीतेला विश्वासात घेऊन प्रशांतनगर, पाथर्डी फाटा, खोडेनगर या ठिकाणी नेऊन वेळोवेळी तिच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केले.

तसेच पिडीतेने लैंगिक संबंधास नकार दिला असता पिरजादे याने तिला मारहाण, शिवीगाळ करुन दमदाटी केली. तसेच महिलेच्या सासरचे व माहेरचे मिळून एकूण १४ तोळे सोन्याच्या दागिन्यांसह ४ लाख ६३ हजार ६०० रुपये आरोपी पिरजादे याने महिलेशी गोडीगुलाबिने वागून वेळोवेळी तिच्याकडून घेतले. काही दिवसांनंतर पिडीतेने आरोपीकडे लग्नाचा तगादा लावला असता त्याने नकार दिला. शिवाय तिच्याकडून घेतलेली रोकड व दागिने परत देण्यास टाळाटाळ केली.

आरोपी पिरजादे याने पिडीत महिलेचा विश्वासघात करून रोकड व सोन्याच्या दागिन्यांचा अपहार केल्याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात बलात्कारासह अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ करीत आहे.

# रिक्षाचालकाकडून मारहाण झाल्याने नाशिकरोडला सिटी लिंक बसचालकांचे चक्काजाम आंदोलन

**नाशिकरोड (चंद्रकांत बर्वे) :- रिक्षाचालकासह त्याच्या मित्रांनी सिटीलिंक बसचालकास मारहाण केल्याच्या निषेधार्थ सिटीलिंक बसचालकांनी आज सकाळी चक्काजाम आंदोलन केले. यामुळे चाकरमान्यांचे हाल झाले.**




पोलिसांनी बसचालकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर बसचालकांनी या बसेस डेपोमध्ये उभ्या करीत या मार्गावर आज बस न चालविण्याचा निर्णय घेतला.

याबाबत माहिती अशी, की सिटीलिंक बसचालक लक्ष्मण नायकार हे आज सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास नाशिकरोड बस स्थानकातून बस घेऊन जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागे एका रिक्षाचालकाने बससमोर रिक्षा उभी केली व बस मागे घेण्यासाठी रिक्षाचालकाने आग्रह केला; मात्र बसच्या मागे आणखी रिक्षा असल्याने बस मागे घेणे शक्य नव्हते. याचा राग आल्याने रिक्षाचालकाने बसची चावी काढून घेतली. ही चावी घेण्यासाठी बसचालक खाली उतरला असता रिक्षाचालक व त्याच्या मित्रांनी बसचालक नायकर यांना बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर रिक्षाचालकासह त्याचे मित्र तेथून पळून गेले. दरम्यान, नाशिकरोड बस स्टॅण्ड परिसरात रिक्षाचालकांकडून बसचालकांना शिवीगाळ, दमदाटी व मारहाणीचे प्रकार नेहमीचे झाल्याने सिटीलिंकच्या बसचालकांना सुरक्षितता नाही. म्हणून सर्व बसचालकांनी आपल्या बसेस रस्त्यावर उभ्या करून नाशिकरोड पोलीस ठाणे गाठले. बसचालकांनी भररस्त्यात बसेस उभ्या केल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. बसचालकांच्या चक्काजाममुळे नोकरदार, विद्यार्थी यांच्यासह प्रवाशांचे मोठे हाल झाले. सुमारे एक ते दीड तास चाललेल्या या आंदोलनामुळे लग्नकार्यासाठी आलेल्या पाहुण्यांची कुचंबणा झाली. चक्काजामदरम्यान पोलिसांनी या प्रकरणात मध्यस्थी केल्यानंतर बसचालकांनी आपल्या गाड्या बाजूला काढून घेतल्या; मात्र सर्व बसचालकांनी बस न चालविण्याचा निर्णय घेत सर्व बसेस डेपोमध्ये घेऊन जात उभ्या केल्या. या आंदोलनामुळे संपूर्ण शहरात सुमारे दीड ते दोन तास वाहतुकीचा खोळंबा उडाला होता.

# टीसीएस प्रकरणातील मुख्य संशयित निदा खानला नाशिक पोलिसांकडून अखेर अटक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिकच्या टीसीएस कंपनीतील बहुचर्चित लैंगिक अत्याचार व बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानला नाशिक पोलिसांनी अटक केली आहे.

> टीसीएस कंपनीतील धर्मांतर आणि अत्याचार प्रकरणी नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक हे छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस आयुक्तांच्या संपर्कात सातत्याने होते. संभाजीनगर येथील पोलिसांच्या समन्वयातून नाशिकच्या गुन्हे शाखेने ही कारवाई केली.
>
> **- संदीप मिटके,**
> सहाय्यक पोलीस आयुक्त, नाशिक



काल (दि. ७) रात्री आठ वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथील नारेगाव परिसरातून निदा खानला ताब्यात घेण्यात आले. गुन्हा दाखल झाल्यापासून निदा खान पोलिसांना गुंगारा देत होती.

छत्रपती संभाजीनगर येथील पोलिसांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. निदा ज्या घरात राहत होती, त्या भागात गेल्या तीन-चार दिवसांपासून २० ते २५ पोलीस तिच्यावर पाळत ठेवून होते. अटकेपासून वाचण्यासाठी निदा खानने उच्च न्यायालयात धाव घेतली होती; मात्र न्यायालयाने तिचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार निदा खान फरारी झाल्यापासून भिवंडीत लपली होती. नंतर ती मुंब्रा येथे पतीकडे राहिल्यानंतर काही दिवस मुंबईत राहिली व नंतर गेल्या २० दिवसांपासून ती छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्य करीत होती. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे नाशिक पोलिसांनी तिचा ठावठिकाणा शोधला होता.

निदा खान संभाजीनगर येथून फरारी होऊ नये म्हणून नाशिक पोलिसांनी कुठलाही गाजावाजा न करता ती राहत असलेल्या परिसरात सापळा रचला. अत्यंत शिताफीने पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. आज पहाटे तिला नाशिक येथे आणण्यात आले असून, दुपारी नाशिकरोड येथील न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. तिच्या या अटकेने या प्रकरणातील अनेक प्रकरणे बाहेर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# रस्ता ओलांडणाऱ्या महिलेची पोत चोरली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- रस्ता ओलांडणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तीन तोळ्यांची सोन्याची पोत दुचाकीस्वारांनी बळजबरीने खेचून नेल्याची घटना पंचवटीत घडली.

फिर्यादी संध्या मंगेश मिलखे (रा. संभाजीनगर, दसक, जेलरोड) या न्यू त्रिमूर्ती लॉन्सच्या समोरील छत्रपती संभाजीनगर रोड ओलांडत होत्या. त्यावेळी एका मोटारसायकलीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने मिलखे यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाची १ लाख ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत बळजबरीने हिसकावून चोरून नेली. हा प्रकार दि. ६ मे रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास पंचवटीत घडला. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार मगर करीत आहेत.

# शहरात दोन घरफोड्यांमध्ये आठ तोळ्यांच्या सोन्याच्या दागिन्यांसह चांदी व रोकड लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या घरफोड्यांमध्ये अज्ञात चोरट्यांनी आठ तोळ्यांच्या सोन्याच्या दागिन्यांसह चांदीचे दागिने व रोकड असा सुमारे लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेल्याच्या नोंदी पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत.

घरफोडीचा पहिला प्रकार भगूर येथे घडला. फिर्यादी रेखा विशाल वाक्चौरे (रा. शहा गार्डन इस्टेट, भगूर) यांची सासू व दोन मुले घरी असताना अज्ञात चोरट्याने दि. ४ जानेवारी ते ३ मे २०२६ या कालावधीत फिर्यादीच्या घरात बेडरूममध्ये प्रवेश केला. तेथे असलेल्या लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडून आतील बाजूस असलेल्या लॉकरला चावी लावून लॉकर उघडले. त्यात असलेला ३५ ग्रॅम वजनाचा १ लाख ७५ हजार रुपये किमतीचा राणीहार, ५० हजार रुपये किमतीच्या दहा ग्रॅम वजनाच्या कानातल्या दोन रिंगा, ५० हजार रुपये किमतीची दहा ग्रॅम वजनाची सोन्याची दोन बिस्किटे, १५ हजार रुपये किमतीचे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गणपतीचे पेंडल, १५ हजार रुपये किमतीची पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी, २० हजार रुपये किमतीच्या चार ग्रॅमच्या सोन्याच्या कानातील बाळ्या, २० हजार रुपये किमतीच्या दोन ग्रॅमच्या सोन्याच्या तीन अंगठ्या, ६ हजार रुपये किमतीच्या चांदीच्या पायातील पट्ट्या व दोन हजार रुपये किमतीचे २० ग्रॅम वजनाचे चांदीचे दोन कडे असा ऐवज घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार गुंजाळ करीत आहेत.

घरफोडीचा दुसरा प्रकार पेठ रोड येथे घडला. फिर्यादी प्रशांत प्रकाश सांगळे (रा. जेपी पार्क, शाहूनगर, पेठ रोड) हे कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराचा कडीकोयंडा कशाच्या तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटात असलेल्या ३० हजार रुपये किमतीच्या साडेसात ग्रॅमच्या कानातील दोन सोन्याच्या रिंगा, ३० हजार रुपये किमतीचे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, साडेसात हजार रुपये किमतीचा दीड ग्रॅमचा सोन्याचा कॉईन, ४ हजार ५०० रुपये किमतीचे चांदीचे दोन गोफ, ६ हजार रुपये किमतीचे चांदीचे पैंजण, ७ हजार ५०० रुपये किमतीचे चांदीचे जोडवे, ४ हजार ५०० रुपये किमतीचे ३० ग्रॅमचे चांदीचे पैंजण व साडेतीन हजार रुपये रोख असा १ लाख २५ हजार रुपये किमतीचा ऐवज घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संजय राऊतांचा जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या

**नाशिक(भ्रमर प्रतिनिधी)** :- वर्तुळाकार मार्ग अर्थात रिंग रोडच्या भूसंपादनावेळी महिलांसह शेतकऱ्यांना झालेल्या कथित मारहाणीवरून संतप्त शिवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी बाधित शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या कार्यालयात तासभर ठिय्या आंदोलन केले.



प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याला मारहाणीचा अधिकार कोणी दिला, जमिनी जबरदस्तीने घेऊ शकत नाहीत, त्यांच्या मागण्या समजून घ्या, असा आग्रह त्यांनी धरला. मोजणीवेळी घडलेल्या कथित मारहाणीच्या घटनेवरून प्रशासनाने इगतपुरी-त्र्यंबकेश्वरचे उपविभागीय अधिकारी पवन दत्ता यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कुंभमेळ्यात शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी ६६ किलोमीटर लांबीच्या रिंग रोडचे काम हाती घेण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी ३६५ हेक्टरचे भूसंपादन केले जाणार असून त्यास अनेक गावांमधून विरोध होत आहे. शनिवारी मातोरी, मुंगसरा गावात मोजणीला विरोध करणाऱ्या शेतकरी व कुटुंबातील महिलांना उपविभागीय अधिकारी पवन दत्ता यांच्यासह पोलिसांनी मारहाण केल्याची तक्रार केली आहे.

बाधित शेतकरी आणि महिलांनी खा. राऊत यांची भेट घेत त्या घटनेच्या चित्रफिती दाखवल्या. त्यानंतर काही वेळात राऊत हे संबधितांना घेऊन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या कार्यालयात आले. त्यावेळी जिल्हाधिकारी प्रसाद हे खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीसाठी गेलेले होते. यामुळे खा. राऊत, खा. राजाभाऊ वाजे, माजी आमदार वसंत गिते यांच्यासह इतर पदाधिकारी आणि शेतकऱ्यांना तासभर जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बसावे लागले. सुमारे तासाभराने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद दाखल झाल्यानंतर राऊत यांनी मोजणीवेळी झालेल्या घटनाक्रमावर चर्चा केली. उपविभागीय अधिकारी दत्ता यांच्याकडून झालेली मारहाण. सक्तीने केले जाणारे भूसंपादन यावरून तक्रारी करीत संबंधितांवर कारवाईची मागणी केली. अर्ध्या तासाच्या चर्चेनंतर राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

मातोरी, मुंगसरे भागात ८० वर्षांच्या महिलेची जमीन रस्ता धरण, पाट अशा वेगवेगळ्या कारणांनी चार वेळा पूर्वीच संपादित झालेली आहे. इतर शेतकरी व महिलांची वेगळी स्थिती नाही. बाधित शेतकऱ्यांचे म्हणणे जाणून घेणे आवश्यक आहे. भगिनींच्या जमिनी वाचल्या पाहिजेत. प्रशासन त्यांच्या जमिनी जबरदस्तीने घेऊ शकत नाही, असे खा.राऊत यांनी सूचित केले.

मोजणीवेळी शेतकऱ्यांना दंडुक्याने मारहाण केल्या प्रकरणी उपविभागीय अधिकारी पवन दत्ता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दिंडोरीतील प्रांताधिकाऱ्यांविषयी अनेक तक्रारी असून लवकरच त्या तालुक्याला भेट देणार असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या संपूर्ण घटनाक्रमाबाबत जिल्हाधिकारी प्रसाद यांच्याशी संपर्क साधूनही प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

नााशिक रिंग रोडच्या भूसंपादनात महिलांसह शेतकऱ्यांना झालेल्या कथित मारहाणीवरून खासदार राऊत यांनी भाजपला लक्ष्य केले. संसदेत हा विषय उपस्थित केला जाईल. या संदर्भात मुख्यमंत्री, महसूलमंत्री आणि आवश्यकता भासल्यास कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्याशी चर्चा करणार असल्याचे खा. संजय राऊत यांनी नमूद केले.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पाच हजार क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या हृदयविकार शस्त्रक्रिया यशस्वी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** हृदयविकार हा शब्द उच्चारताच सर्वसामान्य रुग्णांच्या मनात मोठी भीती निर्माण होते. मात्र, आधुनिक तंत्रज्ञान आणि निष्णात वैद्यकीय हातांच्या जोडीमुळे आता अशक्य वाटणाऱ्या हृदयशस्त्रक्रियाही यशस्वी होत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील हृदयविकार उपचारांत डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांच्या नेतृत्वाखालील एसएमबीटी हृदयविकार शस्त्रक्रिया विभाग एक मोठा आशेचा किरण ठरला आहे. गेल्या १० वर्षांच्या प्रवासात तब्बल ४ हजार ८६९ हृदय शस्त्रक्रियांचा यशस्वी टप्पा पूर्ण करून या विभागाने वैद्यकीय क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. उत्तर महाराष्ट्रातील सर्वात अद्ययावत असलेल्या या विभागात केवळ नाशिकच नव्हे, तर जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहमदनगर जिल्ह्यांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी रेफर केलेले अत्यंत जटील रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत. सर्वात प्रगत आणि अद्यायवत तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे डॉ. सिन्हा यांनी सांगितले.



या विभागाचे प्रमुख आणि प्रख्यात हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दशकात १ हजार ४८० बायपास सर्जरी यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच हृदयाच्या झडपांशी संबंधित १ हजार २६१ वॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि रिपेअर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. हृदयाच्या गुंतागुंतीच्या आजारांवरील उपचारात हा विभाग अग्रस्थानी असून, या यासोबतच रक्तवाहिन्यांशी संबंधित 'व्हॅस्क्युलर सर्जरी'मध्येही विभागाने मोठे यश मिळवले आहे. शस्त्रक्रिया यशस्वी होण्यामध्ये तंत्रज्ञानाइतकाच वाटा त्यानंतरच्या शुश्रूषेचा असतो. या विभागात हृदयविकार रुग्णांची विशेष काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित आणि अनुभवी नर्सिंग स्टाफ २४ तास उपलब्ध आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची होणारी रिकव्हरी ही पूर्णतः 'पोस्ट ऑपरेटिव्ह केअर'वर अवलंबून असते. येथील स्टाफच्या तत्परतेमुळे आणि आत्मीयतेमुळे रुग्ण अत्यंत वेगाने बरे होऊन आपल्या घरी परतत आहेत. आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, तज्ज्ञ डॉक्टरांचा प्रदीर्घ अनुभव आणि शासकीय योजनांची जोड यामुळे हा विभाग आज उत्तर महाराष्ट्रातील गोरगरीब आणि गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरला आहे.

### चिमुकल्यांच्या काळजाची विशेष काळजी

हृदयात छिद्र असणे किंवा जन्मतः हृदयाचे दोष असणाऱ्या चिमुकल्यांसाठी हा विभाग संजीवनी ठरला आहे. गेल्या १० वर्षांत १ हजार १५५ बाल हृदय शस्त्रक्रिया येथे यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. अत्यंत लहान वयातील मुलांवर ओपन हार्ट सर्जरी करण्याचे मोठे आव्हान डॉ. सिन्हा आणि त्यांच्या टीमने लीलया पेलले असून, यामुळे शेकडो कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा एकदा हास्य फुलले आहे. यासोबतच दर महिन्याच्या अखेरच्या शनिवारी आणि रविवारी जन्मजात हृदविकार असलेल्या ३० ते ३५ बालकांवर डिव्हाईस क्लोजर हृदयविकार प्रक्रियादेखील केली जाते.

गेल्या सहा महिन्यांत ९२ मिनिमली इन्व्हेसिव्ह म्हणजेच 'पिन-होल' सर्जरी करण्यात आल्या आहेत. यामध्ये बायपास, वॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि काही जन्मजात लहान मुलांचे हृदयविकार समाविष्ट आहेत. अशा प्रकारच्या उपचारांत छातीवर मोठी चीर देण्याची गरज नसते, त्यामुळे शरीरावर शस्त्रक्रियेचे विद्रूप डाग राहत नाहीत. रक्तस्राव कमी होतो, संसर्गाचा धोका टळतो तसेच रुग्ण अवघ्या काही दिवसांतच हालचाल करून पुन्हा आपल्या कामावर रूजू होऊ शकतो. विशेषतः बालक व अविवाहित तरुणी यांच्यासाठी पिन-होल सर्जरी वरदानच ठरली आहे, असे हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विद्युतकुमार सिन्हा यांनी सांगितले. संपूर्ण हृदयविकार उपचार एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये एकाच छताखाली उपलब्ध आहेत. यात तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मार्गदर्शन मोफत केले जाते. तसेच हृदयविकाराची लक्षणे असलेल्या रुग्णांवर ईसीजी, ४-डी इको, स्ट्रेस टेस्ट केल्या जातात. तसेच याठिकाणी अल्ट्रा मोड्युलर कॅथलॅब आणि सुसज्ज कार्डियाक ओटीचा समावेश आहे. तसेच, हृदयाच्या गुंतागुंतीच्या समस्यांसाठी रोटा आणि आयव्हीयूएस सारखी उपकरणेही याठिकाणी उपलब्ध आहेत. याद्वारे बायपास होऊ न शकणाऱ्या रुग्णांवर तसेच बायपासची भीती असलेल्या रुग्णांवर कॉम्प्लेक्स अन्जिओप्लास्टी करणे शक्य झाले आहे, असे एसएमबीटी हार्ट इन्स्टिटयूटचे संचालक डॉ. गौरव वर्मा यांनी सांगितले.

### शासकीय योजनेतून मोफत उपचार

एसएमबीटी व्यवस्थापनाने नेहमीच रुग्णसेवेला प्राधान्य दिले आहे. याठिकाणी होणाऱ्या बहुतांश हृदयशस्त्रक्रिया 'आयुष्मान भारत' प्रधानमंत्री जनआरोग्य योजनांतर्गत पूर्णपणे मोफत केल्या जातात. आर्थिक परिस्थितीअभावी कोणाचेही उपचार थांबू नयेत, ही व्यवस्थापनाची भूमिका असून, योजनेत न बसणाऱ्या शस्त्रक्रियांसाठी ऑपरेशन चार्जेस, डॉक्टर चार्जेस, भूलतज्ज्ञ चार्जेस, नर्सिंग चार्जेस, जेवण सर्व मोफत करण्यात आले असून केवळ औषधांच्या खर्चात हजारो रुग्णांवर आजवर उपचार करण्यात आले आहेत, असे संचालक सचिन बोरसे यांनी सांगितले.

# स्मार्ट सिटी कंपनीचे कर्मचारी उच्च न्यायालयात

## कोणतीही सक्तीची कारवाई न करण्याचे अंतरिम आदेश

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- राज्य शासनाने शहरी विकास विभागामार्फत २२ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत निर्माण केलेली सर्व पदे तात्काळ बंद करून कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त करण्याचे आणि उर्वरित कामे महापालिकेकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते.

हा निर्णय कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच कोणतीही सुनावणी न घेता घेतला गेला असून, या विरोधात स्मार्ट सिटी कर्मचाऱ्यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने संबंधीत कर्मचाऱ्यांचा मुद्दा मान्य करून २२ एप्रिल २०२६ च्या शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांवर कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असा अंतरिम आदेश दिला आहे. हा आदेश दि. १७ जून २०२६ पर्यंत लागू राहील.

स्मार्ट सिटी मिशनच्या माध्यमातून तयार झालेले कुशल मनुष्यबळ आता शासनाच्या हातात आहे. मात्र शासन निर्णयामुळे ते मनुष्यबळ वाया जाण्याचा धोका आहे आणि यामुळे स्मार्ट सिटी मिशनचा मुळ उद्देशच धोक्यात आल्याचे याचिकेत म्हटले आहे.

'स्मार्ट सिटीज मिशन'च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार याचिकाकर्ता आणि स्मार्ट सिटी कंपनीच्या इतर कर्मचाऱ्यांचे सामावून घेणे किंवा पुनर्वसन करण्यासाठी तातडीने योग्य योजना तयार करावी आणि तिची अंमलबजावणी करावी. तसेच आमच्या उपजीविकेच्या हक्काचे संरक्षण करावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक चिंता कमी होईल. आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. भावंडांबाबत चिंता वाटेल.
- **वृषभ** : औषधपाण्यासाठी खर्च वाढेल. सरकारी कामासाठी पाठपुरावा करावा. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मिथुन** : नोकरी–व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल. उत्साह, धडाडी राहील. अडचणीतून मार्ग निघेल.
- **कर्क** : कार्यक्षेत्रात अनुकूलता वाढेल. कला–गुणांना चांगल्या संधी लाभतील. नवीन गुंतवणूक सध्या नको.
- **सिंह** : नव्या योजना मार्गी लावता येतील. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. समस्यांची चिंता नको.
- **कन्या** : महत्त्वाच्या कामास अधिक वेळ लागेल. कलेचा विकास होत जाईल. स्थावर प्रश्न संभवतात.
- **तूळ** : भाग्योदयात अडचणी येतील. चिकाटी, प्रयत्नातून यश मिळेल. नव्या कल्पना साकार करू शकाल.
- **वृश्चिक** : स्पर्धांमध्ये यश मिळत जाईल. आशादायी वातावरण राहील. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावे.
- **धनु** : शनि–मंगळ प्रतियोग अस्वास्थ्य वाढवेल. लांबचे प्रवास नकोत. शिक्षणातून प्रगती करता येईल.
- **मकर** : शारीरिक तक्रारी राहणार आहेत. तुर्तास मोठी गुंतवणूक टाळावी. आर्थिक चिंता कमी होणार आहे.
- **कुंभ** : नव्या विचारांना चालना द्यावी लागेल. अंगीकृत कार्यात यश मिळेल. अनुकूलता वाढत जाईल.
- **मीन** : जुन्या वास्तुंची दुरूस्ती करून घ्यावी. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या कामांना गती मिळेल.

## दिनविशेष

### ८ मे

१९८२ : कवी अनिल यांचे निधन.

२०१३ : कोळसा गैरव्यवहाराच्या तपासणीबाबतच्या अहवालाचा 'आत्मा'च बदलल्याचे खरमरीत ताशेर सर्वोच्च न्यायालयाने ओढले.

२०१७ : लालूप्रसाद यादव यांच्यावर पशुखाद्य गैरव्यवहारप्रकरणी गुन्हेगारी कटाचा खटला चालणार असल्याचं स्पष्ट झालं.

२०१८ : चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण चर्चा.

## आरोग्यमंत्र
### उशीरा जेवण टाळा

धकाधकीचं जीवन, कामाचा ताण, घरी जायच्या अडनिड्या वेळा यामुळे अनेकजण रात्रीचं जेवण उशीरा घेतात. रात्री उशीरा जेवल्याने आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. उशीरा जेवल्याचे शरीरावर वाईट परिणाम होतात. रात्री आठनंतर जेवल्याने शरीरात 'ॲड्रेनलाईन' नामक स्ट्रेस हार्मोन्सची निर्मिती होते आणि आपण तणावाखाली येतो. रात्री उशीरा जेवल्याचे इतरही अनेक दुष्परिणाम आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या...



✻ उशीरा जेवल्याने अन्नाचं रूपांतर ट्रायग्लिसराइड्समध्ये होतं. यामुळे शरीरात अतिरिक्त फॅट्स जमा होऊन वजन वाढायला सुरूवात होते.

✻ जेवायला उशीर झाल्याने पचनाच्या समस्या निर्माण होतात. यामुळे रात्रीच्या झोपेवरही परिणाम होतो.

✻ उशिरा जेवल्याने झोपही उशीरा लागते आणि ताण निर्माण करणाऱ्या हार्मोन्सची निर्मिती होऊ लागते.

✻ अन्नपचन योग्य पद्धतीने न झाल्याने अन्नातले आवश्यक ते पोषक घटक शरीराला मिळत नाहीत.

✻ शरीरात ॲड्रेनलाईन नामक हार्मोनची पातळी वाढल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

✻ उशीरा जेवल्याने वजन वाढतं. शरीरात वाईट कोलेस्टेरॉलची निर्मिती होते आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

## सफर देशांची
### ओळख सुरीनेमची

दक्षिण अमेरिकेच्या उत्तर–पूर्व किनारपट्टीवर सुरीनेम नावाचा देश वसला आहे. गयाना, ब्राझील सुरीनेमचे शेजारी. या भागावर डचांचं म्हणजे नेदरलँडचं राज्य असल्यामुळे डच ही इथली अधिकृत भाषा आहे. १,६५,००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असणारा सुरीनेम लोकसंख्या आणि आकाराच्या दृष्टीने दक्षिण अमेरिकेतला सर्वात लहान देश आहे. पॅरॅमॅरिबो ही या देशाची राजधानी आणि सर्वात मोठं शहर. सुरीनेम नदीच्या किनारी हे शहर वसलं आहे. या देशाची अर्धी लोकसंख्या राजधानीत रहाते. देशाच्या ८० टक्के भूभाग जंगलांनी व्यापलेला आहे. इथल्या सेंट्रल सुरीनेम नेचर रिझर्व्हला युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. देशात बरेच तलावही आहेत. राष्ट्रीय उद्यानांची निर्मितीही करण्यात आली आहे. पॅरॅमॅरिबोमध्ये आजही सतराव्या आणि अठराव्या शतकातल्या डच पद्धतीने बांधलेल्या इमारती पहायला मिळतात. १५९३ मध्ये स्पॅनिश लोकांनी हा भूभाग शोधला. पण १६०२ नंतर डच लोकांनी इथे वसाहती स्थापन करायला सुरूवात केली. त्यानंतर इंग्रजही या देशात आले. १६६७ मध्ये इंग्रजांनी या देशाचा ताबा डचांना दिला. १९७५ मध्ये सुरीनेम स्वतंत्र झाला.

## स्टाईल स्टेटमेंट
### गेट रेडी फॉर वीकेंड

वीकेंडला एखादा प्लॅन ठरल्यावर ऑकेजनला साजेशा पेहरावाचा शोध सुरू होतो. अशावेळी नेहमीच्या फॉर्मल्सपेक्षा काहीतरी ट्रेंडी, हटके घालण्याची संधी असते. उन्हाळ्यात तर हमखास वीकेंड प्लॅन्स ठरतात. कुटूंबिय, मित्रमैत्रिणींसोबत पिकनिक, ब्रंच किंवा शॉपिंगला जायचं असेल तर पेहरावही मोकळाढाकळा हवा. उन्हाळ्यातल्या वीकेंड फॅशनच्या या काही टिप्स...

✻ आरामदायी, स्टायलिश आणि ट्रेंडी अशा तिन्ही गोष्टींचा मेळ साधायचा असेल तर शर्ट ड्रेसला पर्याय नाही. शर्ट ड्रेसची सध्या प्रचंड क्रेझ आहे. तुम्हाला शर्ट आवडत असेल पण जीन्स किंवा ट्राउझर घालायचा कंटाळा आला असेल तर शर्ट ड्रेस ट्राय करा.हा पेहराव तुम्हाला सॉफिस्टिकेट लूक देईल. फिटिंगवाला किंवा थोडा ढगळ शर्ट ड्रेस घ्या. त्यावर बेल्ट बांधा. मोजक्या ॲक्सेसरीज घाला. तुमची फॅशन नक्कीच लक्षवेधी ठरेल. **(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, ८ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख कृ. ६, चंद्रराशी : मकर, नक्षत्र : उत्तराषाढा, योग : शुभ, सूर्योदय ६.०९, सूर्यास्त ७.०१

## फॉरवर्ड्स

**दुनियादारी क़ा हुनर किसनें कितना देख़ा हैं...**

**तुम क़िताब सें सिखें हों.. हम तो वक़्त सें सिखें हैं...!**

## करीअर ग्रोथ

इंजिनिअरींगनंतरही तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता. इंजिनिअरींगच्या कोणत्या शाखा सरकारी नोकरीत चांगली संधी देतात याविषयी जाणून घेऊ या.

✻ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींगमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्हाला खाजगी क्षेत्रात अनेक संधी मिळत असल्या तरी सरकारी नोकरी मिळवण्याची इच्छा असेल तर राज्य विद्युत महामंडळ, भारतीय रेल्वे, भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड, भारतीय लष्कर, नौदल, हवाई दल, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था या ठिकाणी अर्ज करू शकता. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### इव्हेंट मॅनेजर व्हा

आजकाल कोणत्याही समारंभाचं यश नेटकं नियोजन, मनमोहक सजावट आणि उत्तम पदार्थ यावर अवलंबून असतं. या सगळ्या एकत्रित कामालाच इव्हेंट मॅनेजमेंट म्हणतात. सध्या वाढत्या कॉर्पोरेट ट्रेंडमध्ये इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. विशेष म्हणजे यात



प्रशिक्षित मनुष्यबळाची चणचण जाणवते. त्यादृष्टीने धडपड्या आणि उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेल्या तरुणांनी या क्षेत्रात आवर्जुन शिरलं पाहिजे. आपण टीव्हीवर अनेक शोज बघतो. त्यांच्या स्टेजवरचा झगमगाट, प्रकाश योजना, मांडणी आणि ट्रिक्स हे सारं पाहिलं म्हणजे नवल वाटतं. पण यासाठी अनेक कलाकार अनेक दिवस झटतात आणि कंपनीही त्यावर लाखो रुपये खर्च करते. आताच्या काळात एकेका इव्हेंटवर करोडो रुपये खर्चले जात आहेत. याचा फायदा इव्हेन्ट मॅनेजमेंटच्या व्यवसायात शिरणाऱ्या तरुणांना होऊ शकतो. विवाहाच्या आयोजनाचंही मॅनेजमेंट केलं जातं आणि निरनिराळ्या स्वरूपात केलं जातं. या पार्श्वभूमीवर सध्या केवळ इव्हेन्ट मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. मात्र एमबीए चं शिक्षण देणाऱ्या काही संस्थां या विषयाचं शिक्षण देत आहेत. इच्छुकांना कोणत्याही व्यवस्थापन शास्त्र संस्थांकडे चौकशी करता येत नाही.

## खेचाखेची
### मूळ समस्या

सध्याची खरी अडचण म्हणजे इराण आणि अमेरिकेमधील वेळेतील फरक.

ट्रम्प धमकी देतात, तेव्हा इराणी लोक झोपलेले असतात; आणि ते जागे होऊन त्या धमकीला प्रत्युत्तर देतात, तेव्हा ट्रम्प झोपलेले असतात.

.

.

.

हे चक्र असंच सुरू राहतं. सगळ्यात आधी, ही समस्या सोडवण्याची गरज आहे!

## वेगळं काही

चीनमधला एक धावपटू बेई बिन याने उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतचं २४,११० किलोमीटरचं अंतर धावून पूर्ण केलं. म्हणजे तो अंटार्टिका खंडातून आर्टिक खंडात पोहोचला. हे अंतर त्याने ४३३ दिवसांमध्ये पूर्ण केलं. बेई प्रत्येक दिवशी सरासरी ५६ किलोमीटर अंतर धावला. २४,११० किलोमीटर अंतर म्हणजे ४२ किलोमीटरच्या ५७४ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये धावणं! या काळात बेई बिन १३ देशांमधल्या ६५ शहरांमधून धावला. यात अमेरिका, कॅनडा, चिली, मेक्सिको, ग्वाटेमाला, कोस्टरिका, अर्जेंटिना, पेरूसारख्या देशांचा समावेश आहे. या धावपटूने मार्च २०१८ मध्ये या प्रवासाला सुरूवात केली. या दरम्यान त्याला निसर्गाच्या आव्हानाला सामोरं जावं लागलं.

## ॲक्सेसरीज
### आरामदायी पादत्राणं निवडा

उन्हाळ्यात उन्हाच्या प्रखरतेमुळे केवळ हात, चेहरा, केस यांच्याशी संबंधित समस्या उद्‌भवतात असं नाही. या ऋतूतील चिकचिकाटामुळे पायाच्या त्वचेलाही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यात पादत्राणांची निवड करताना काळजी घ्यावी. या संदर्भातील काही महत्त्वाच्या टीप्स...



✻ फ्लिप फ्लॉप स्लिपर – उन्हाळ्यात फ्लिप फ्लॉप स्लिपर अत्यंत आरामदायी असतात. पायांना घाम येत असेल तर या उपयुक्त ठरतात. यात पाय कोरडे राहण्यास मदत होते.


✻ ॲथलेटिक सँडल – ॲथलिट सँडल्स उत्तम ठरतात. यामुळे पावलांमध्ये हवा खेळती राहून घामाचा त्रास होत नाही.

✻ एस्पाड्रिल्स – बाजारातील लोकप्रिय प्रकार म्हणजे एस्पाड्रिल्स. या पादत्राणांमध्ये आराम आणि स्टाईल या दोहोंचा संगम पहायला मिळतो.

✻ डेनिम स्लाईड्स – उन्हाळ्यात वॉर्डरोबमध्ये डेनिम असतं तसंच ते शू रॅकमध्येही असावं. कडक उन्हाळ्यात डेनिमची आरामदायी पादत्राणं पसंतीस उतरतात.

✻ स्लाईड्स – स्टायलिश आणि आराम या दोहोंचा संगम हवा तर स्लाईड्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. तरुणींमध्ये या स्टाईलची क्रेझ दिसून येते.

# शब्दकोडे क्रमांक २२१३



**आडवे शब्द :–**


१) मान्य, कबूल
३) राजकारभाराचे प्रमुख शहर
६) बाळसेदार
१०) वास लावलेले
११) एक सुगंधी वनस्पती
१३) यम, जमाना
१४) बडबड्या
१६) उजाड, ओसाड
१८) कोवळी फांदी
२०) सापाने सोडलेली त्वचा
२१) तलवारीचे म्यान, दुमड
२२) सजावट, देखावा
२३) ✻✻✻ जावक
२४) क्वचित आढळणारा, दुर्मिळ
२५) दागदागिने
२६) फुलाची टोपली
२७) एक मराठी महिना
२९) श्रीमंत
३३) श्रीविष्णूचे बटु रूप
३५) राक्षस
३६) परंपरागत, वहिवाटीतला
३८) गेरु, कुंडीला लावण्याची माती
३९) कदर करणारा
४१) उभट आकाराची लोटी
४३) तादाम्य पावणे, एकरूप होणे
४४) मरणारा
४५) जन्म
४६) पुन्हा
४७) सुसंस्कृत
४९) नम्र, वाकलेला
५०) पाठीचा कणा
५२) डुक्कर
५४) वर्णन करणे, स्तुती करणे
५५) आस्था, काळजी
५७) दुधावर येणारे आवरण
५८) बरोबर, तंतोतंत
५९) कर्ज देणारा
६२) माफ
६४) ट्रस्टला मराठी प्रतिशब्द
६५) बंगाली भाषेत रुपाया
६६) अखबार, बातमीपत्र

**उभे शब्द :–**

१) शनिवार
२) कणीदार
३) वेळप्रसंगी, रात्रीबेरात्री
४) एक प्रकारचा साप
५) पाणी
७) टिंगल ✻✻✻, कुचेष्टा
८) टीका करणारा
९) शिव्या शाप
१२) पूर्वज
१५) चाळीत राहणारा
१७) ढीग
१९) साद, बोलाविणे
२२) पायापासून डोक्यापर्यंत
२३) नौदल
२४) जहर
२७) नागरिक
२८) हळू, संथपणे
३०) श्रीकृष्णाचे एक नाव
३१) जन्म–मृत्यू
३२) सदन
३३) वायू, वाहणारी हवा
३४) अग्निसंस्कार, कागदाचे चार बंद
३५) मोठा भाऊ
३७) गाड्या उभ्या करण्याची जागा
३९) उणीव, कमीपणा
४०) चव समजाविणारे इंद्रिय
४२) उग्र वासाचा पाकळ्यांचा कंद
४३) कापसाची बी
४५) जनकराजाची मुलगी, सीता
४८) एक शेंगभाजी
५०) कपाळभर लावलेले कुंकू
५१) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
५३) सदोदित, एकसारखे
५६) कशा प्रकारचा?
६०) चुलता
६१) इसब,गजकर्ण इ. त्वचारोग
६३) प्रेम, ममता, धन.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




## उद्यापासून संध्या प्रशिक्षण शिबिर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :– येथील चतु:शाखीय ब्रह्मवृंद गायरान ट्रस्ट नाशिकच्या वतीने दरवर्षीप्रमाणे शनिवार दि. ९ मे ते १५ मे या कालावधीत रोज सायंकाळी ५ वाजता श्रीगोपाल मंगल कार्यालय, सरदार चौक, पंचवटी येथे विनामूल्य संध्या प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षण वर्गात वे. शा. सं. डॉ. नरेशशास्त्री पुजारी मार्गदर्शन करणार आहेत.

प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी संस्थेचे कार्यालय गोपाल मंगल कार्यालय, सरदार चौक, पंचवटी येथे व्यवस्थापक जितेंद्र कुलकर्णी (भ्रमणध्वनी क्रमांक ९८९०६०४६८१) यांच्याकडे नावनोंदणी करावी, असे आवाहन अध्यक्ष मोहन रानडे, कार्यवाह हेमंत कुलकर्णी, खजिनदार प्रमोद गर्गे आणि विश्वस्त ॲड. मनोहर पुजारी, सुभाषचंद्र जोशी, ॲड. अविनाश भिडे, अजिंक्य साने, सुधीर कावळे व सी. ए. निशांत कुलकर्णी यांनी केले आहे.

## शुटिंगमध्ये अंजली भागवतला तीन रौप्य

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :– नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या २४ व्या कुमार सुरेंद्रसिंग शुटिंग चॅम्पियनशिपमध्ये नाशिकच्या



अंजली भागवत हिने रौप्यपदकांची कमाई केली. तिने महिलांच्या २५ मीटर पिस्तोल प्रकारात पदकांची कमाई केली. यामध्य वैयक्तिक गट, सांघिक गट आणि युथ गट अशा तिन्ही प्रकारात अंजली भागवत हिने पदके प्राप्त केली.

तिच्या यशाबद्दल सातपूर येथील एक्सएल टार्गेट शुटिंग असोसिएशन आणि भीष्मराज मेमोरियल शुटिंग रेंजतर्फे अभिनंदन करण्यात आले. मुख्य प्रशिक्षक व सचिव श्रद्धा नालमवार यांनीही शुभेच्छा दिल्या.

## एकनाथ उगले यांचे निधन

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :– चास ता. सिन्नर येथील रहिवासी एकनाथ वाळीबा उगले यांचे



वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ भाऊ, बहीण, २ मुले, २ मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. ते अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अशोक उगले यांचे वडील होत.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

**शुक्रवार ८/५/२०२६ कल्याण शुभअंक**

| | | |
|---|---|---|
| १ | ५ | ७ |
| १४६ | १२२ | १२४ |
| २९० | २३० | ३४० |
| १५ | ५७ | ७३ |
| १७ | ५९ | ७५ |

**शुक्रवार ९/५/२०२५ मुंबई शुभअंक**

| | | |
|---|---|---|
| २ | ८ | ९ |
| २५५ | १७० | १२६ |
| ३४५ | ३५० | २३४ |
| २६ | ८४ | ९५ |
| २८ | ८६ | ९७ |

## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभू ज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :–** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# म. फुलेंनी केवळ विचार नव्हे, तर समाजाला कृती कार्यक्रम दिला : सुभाष वारे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** विचार वेगळे असले तरी संवाद तुटता कामा नये. म. फुले यांच्या अनुषंगाने अनेक मतभेद आहेत, किंवा पसरवले गेले आहेत. प्रत्यक्षात फुले यांनी केवळ अनेक बाबींचा निषेधच केला नाही, तर संपूर्ण आयुष्यात प्रत्येक वेळी वेगळा कृती कार्यक्रम दिला, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील सुभाष वारे यांनी येथे केले.

गोदाघाटावरील देवमामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेत क्रांतिसूर्य म. ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित, ॲड. द. तु. जायभावे स्मृती व्याख्यानात 'सत्यशोधक बनू या, आनंदाने जगू या!' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ॲड. जयंत जायभावे, शेफालीताई भुजबळ, जयंत खडताळे, उपस्थित होते. सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते क्रांतिसूर्य म.



ज्योतिबा फुले यांच्या अर्ध पुतळ्याचे व ॲड. द. तु. जायभावे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे ठकसेन गोराणे यांनी वारे यांचा सत्कार केला.

व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. दरम्यान, यंदापासून नव्याने सुरू करण्यात आलेल्या उपक्रमात व्याख्यानस्थळी दिपक वर्मा यांचे चित्रप्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाला रसिक नाशिककरांनी भरभरून प्रतिसाद दिला.तत्कालीन परिस्थिती आणि पार्श्वभूमीचा यथोचित उल्लेख करून सुभाष वारे म्हणाले की, विधवांचे प्रश्न असो की, महिलांच्या शिक्षणाचा विषय असो, म. फुले यांनी धडाधडीने पुढाकार घेतल्याचे आढळते. या संपुर्ण परिस्थितीचे प्रतिबिंब आणि म. फुले यांचे विद्रोही व्यक्तिमत्व आदी बाबी आपल्याला त्यांच्या गुलामगिरी या ग्रंथात आढळतात. त्यांच्या पेहरावावरुन ते जास्त शिकलेले नसावेत, असे वाटत असले तरी त्यांचे इंग्रजीचे ज्ञान आणि वाचन, अभ्यासातून मिळवलेल्या जाणिवा प्रचंड व्यापक होत्या, असे सांगताना त्यांनी रेनेसन्स चळवळीच्या अभ्यासाचे उदाहरण दिले. त्याचप्रमाणे विषयाच्या अनुषंगाने त्यांनी दर्यावर्दी वास्को दी गामा आणि कोलंबस यांच्याबाबतची कथाही वर्णन केली. या सर्वांचा अर्थ एकच की चर्च सांगते तेच सत्य नाही, तर त्या पलीकडेही मोठा विचार जगात आहेत, ही विचारसरणी पुढे आल्याचे सांगून त्यांनी तत्कालीन परिस्थिती आणि म. फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा आढावा घेतला.

# दिवसा वीज वापरणाऱ्या ७० लाख ग्राहकांना २,२३५ कोटी रुपयांचा लाभ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून, त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला, त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते. त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे.

सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून, चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला. हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे.

औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.

घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती.

राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे. या घटकांसाठी संबंधित १२,९८९ ग्राहकांना २०२ कोटी रुपयांचा टीओडी लाभ झाला आहे.

राज्यातील सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय उर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे. वीज ग्राहकांनी अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून टीओडी सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# आजपासून शहरात आंबा व तृणधान्य महोत्सव

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा):-** तृणधान्यांपासून मूल्यवर्धित उत्पादने तयार करणाऱ्या नवउद्योजकांना तसेच आंबा उत्पादकांना थेट ग्राहकांशी जोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय, नाशिक यांच्या वतीने 'आंबा व मिलेट (तृणधान्य) महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे.

'उत्पादक ते थेट ग्राहक' या संकल्पनेवर आधारीत हा महोत्सव ८ ते १० मे या कालावधीत उदोजी महाराज संग्रहालय, आकाशवाणी टॉवरजवळ, गंगापूर रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात येणार आहे. नागरीकांनी या महोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन पणन मंडळाचे विभागीय उपसरव्यवस्थापक एस. वाय.पुरी व विभागीय व्यवस्थापक बी.सी. देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

या महोत्सवाचा शुभारंभ शुक्रवार ८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या प्रतीचा आंबा मिळावा तसेच तृणधान्याचे महत्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या संकल्पनेतून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात ४० स्टॉल्सद्वारे आंबा तसेच तृणधान्य व त्यापासून बनविलेल्या उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवात रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पालघर व ठाणे या जिल्ह्यातील जी. आय. मानांकन मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी व इतर वाणांचा आंबा येथे उपलब्ध होणार आहे. तसेच तृणधान्य उत्पादक, प्रक्रिया उद्योगांमध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, नवं उद्योजक महोत्सवात सहभागी होणार आहेत.

याबाबत अधिक माहितीसाठी विभागीय व्यवस्थापक देशमुख यांच्याशी मोबाईल क्रमांक ९४२३६१७०३५ संपर्क साधावा, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# 'राजा शिवाजी' चित्रपट करमुक्त करावा; रायुकाँचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** 'राजा शिवाजी' हा चित्रपट



महाराष्ट्रात करमुक्त करावा, असे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी पाठविले आहे.

महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले होते, ते त्यांच्या गनिमी काव्याच्या युद्धकौशल्याने. युद्धात महाराजांना अनेक मावळ्यांनी साथ दिली. या युद्धकौशल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांची ख्याती जगात सर्वत्र पसरली. मावळ्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता स्वराज्यासाठी आपले प्राण पणाला लावले. युद्धात महाराजांनी शौर्याने अनेक गडकिल्ले कसे मिळविले, याचा इतिहास खूप मोठा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकातून शिकविला जातो; परंतु तो सविस्तरपणे शिकविला जात नाही. महाराष्ट्राचा इतिहास सांगणारा 'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक चित्रपट महाराष्ट्रातील प्रेक्षकांसाठी मनोरंजन करमुक्त करण्यात यावा, असे युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी पत्रात नमूद केले आहे.

# ई-चलन वेळेत न भरल्यास वाहनांवर कारवाई होणार : प्रदीप शिंदे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम २१, १६७ व १६७ अ मध्ये पुढीलप्रमाणे नियमांमध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

त्यामुळे ई-चलन वेळेत भरावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रदीप शिंदे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केले असून, ई-चलन वेळेत न भरल्यास वाहनांवर कारवाई होणार असल्याचे सांगितले आहे.

नवीन नियमानुसार, जर एखाद्या वाहनचालकाने एका वर्षात पाच किंवा अधिक वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केले असेल, अशा वाहन चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित किंवा रद्द केले जाईल. तसेच, चलन प्रणाली आता अधिक पारदर्शक करण्यात आली असून प्रत्यक्ष तसेच इलेक्ट्रॉनिक (ई-चलन) पध्दतीने दंड आकारला जाणार आहे. वाहनधारक-वाहनचालकांना चलन भरण्यासाठी किंवा आक्षेप नोंदवण्यासाठी ४५ दिवस मुदत देण्यात आली आहे.

या कालावधीत कोणतीही कार्यवाही न केल्यास चलन स्विकारले गेले, असे मानले जाईल. तसेच पुढील ३० दिवसांत दंड भरणे बंधनकारक राहील.चलनाला आव्हान द्यायचे असल्यास, वाहन चालक व मालकांना संबंधित पुरावे ४५ दिवसांत ऑनलाईन सादर करावे लागतील व आक्षेप नाकारल्यास पुढील ३० दिवसांत ५०% दंड भरुन न्यायालयात अपील करता येईल.

चलन न भरल्यास वाहन मालकांवर कठोर कारवाई केली जाईल. यात नोंदणी प्रमाणपत्र आणि अनुज्ञप्ती संबधित सेवा बंद होणे, वाहनांवर व्यवहार होणार नाही अशी नोंद घेणे, तसेच वाहन जप्त करण्याची कारवाई, यांचा समावेश आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने सर्व नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विवाहितेची आत्महत्या; पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** विवाहितेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती व त्याची प्रेयसी यांच्यासह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गणेश गोपाळराव वाळके (रा. कासार दुमाला, ता. संगमनेर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे, की त्यांची बहीण आशा प्रवीण घोटेकर (वय ४०, रा. अंबिका निवास, दसक गाव) हिने पती प्रवीण साहेबराव घोटेकर (वय ४२), सासरे साहेबराव सावळीराम घोटेकर (वय ६५), सासू लताबाई घोटेकर (वय ६०), दीर राजेंद्र घोटेकर (वय ४५), जाऊ चित्रा घोटेकर (वय ४३, रा. अंबिका निवास, दसक गाव, नाशिक) व आरती नयन गोसावी यांच्या जाचाला कंटाळून, तसेच फिर्यादीच्या दाजी याचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याने तिच्याही जाचाला कंटाळून विवाहिता आशा घोटेकर हिने आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पतीसह दिराला अटक करण्यात आली आहे.

# सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज स्मृतिदिन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** येथील सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांचा स्मृतिदिन मोठ्या उत्साहात व आदरपूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.




या प्रसंगी सार्वजनिक वाचनालयाच्या उपस्थित पदाधिकारी व मान्यवरांनी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा व विचारांचा आढावा घेतला. त्यांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि बहुजनांच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाची माहिती सावानाचे सदस्य व सेवकवृंद यांना दिली. तसेच त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात समता आणि बंधुता निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

वाचनालयाचे पदाधिकारी ग्रंथ सचिव देवदत्त जोशी, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, पुस्तक मित्र मंडळ प्रमुख मंगेश मालपाठक, सांस्कृतिक कार्य. सदस्य प्रशांत जुन्नरे तसेच सेवक वृंद सहा. व्यवस्थापक योगिनी जोशी, अनिता नगरकर, भागवत कुलकर्णी, राधा राऊत, सुखदा पांडे, कीर्ती नागरे तसेच सुनील देशपांडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# आयटकच्यावतीने भांडाफोड परिषद उत्साहात

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** आयटक नाशिक जिल्हा कामगार संघटनेच्या वतीने आयोजित भांडाफोड परिषद औरंगाबादकर सभागृहात मोठ्या उत्साहात, विचारप्रवर्तक वातावरणात आणि जनतेच्या उत्स्फूर्त सहभागासह पार पडली.

'चला चमत्काराची पोलखोल करूया... विज्ञानाच्या नजरेतून!' या घोषवाक्याखाली झालेल्या या परिषदेमध्ये अंधश्रद्धा, बुवाबाजी, खोटे चमत्कार आणि सर्वसामान्य जनतेची होत असलेली आर्थिक, मानसिक व सामाजिक फसवणूक यावर सखोल चर्चा करण्यात आली.

परिषदेचे प्रास्ताविक कॉ. प्राजक्ता कापडणे यांनी केले. या परिषदेत डॉ. ठकसेन गोराणे आणि महेंद्र दातरंगे यांनी तथाकथित 'चमत्कारांची' प्रात्यक्षिके सादर केली. हातातून आग काढणे, वस्तू हलवणे, अंगात देव येणे किंवा भुतबाधा असल्याचे भास निर्माण करणे, अशा अनेक प्रकारांचे त्यांनी प्रत्यक्ष उलगडून दाखवले.

या प्रात्यक्षिकांमुळे 'चमत्कार' म्हणून भासवले जाणारे प्रकार प्रत्यक्षात वैज्ञानिक प्रयोग किंवा फसवणुकीच्या युक्त्या असल्याचे



स्पष्ट झाले आणि उपस्थितांमध्ये अंधश्रद्धेविरोधात सजगता निर्माण झाली. ॲड. सुशील कुमार इंदवे यांनी अंधश्रद्धा व बुवाबाजीविरोधातील कायदेशीर बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यांनी जादूटोणा विरोधी कायद्याच्या तरतुदी, तसेच फसवणूक, मानसिक व शारीरिक अत्याचार यांसारख्या गुन्ह्यांवर कायदेशीर कारवाई कशी करता येते, याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. नागरिकांनी अशा घटनांविरोधात गप्प न बसता तक्रार नोंदवणे आणि कायद्याचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रा. आशा लांडगे यांनी महिलांवर अंधश्रद्धेचा होणारा परिणाम अधोरेखित केला.

यावेळी प्रमुख मान्यवर आयटकचे राज्यसचिव राजू देसले, आयटकचे जिल्हा अध्यक्ष व्हि. डी. धनवटे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नाशिक जिल्हा सचिव मनोहर पगारे, शहर सचिव तल्हा शेख, कांचन पवार, फराह शेख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माया खोडवे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार भीमा पाटील यांनी मानले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधान प्रास्ताविकेचे हर्षाली अडांगळे यांनी वाचन केले.

या प्रसंगी नामदेव बोराडे, फराह शेख, करुणासागर पगारे, शिवदास म्हसदे, डॉ. रामदास भोंग आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपा शिक्षण विभागाच्या वतीने न्यूज लेटरचे प्रकाशन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** नाशिक महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांवर आधारित न्यूज लेटरचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाले.

महानगरपालिकेच्या शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण व आधुनिक सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा तसेच पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश मनपा शाळांमध्ये करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या न्यूज लेटरचे प्रकाशन महापौर हिमगौरी आडके यांच्या हस्ते करण्यात आले. उपमहापौर विलास शिंदे, नगरसेवक मंगला नन्नावरे, रुपाली निकुळे तसेच मनपा शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. नाशिक महानगरपालिका शाळांमध्ये मागील वर्षभरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत.

या न्यूज लेटरमध्ये स्मार्ट स्कूल अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने डिजिटल वर्गखोल्यांची निर्मिती, जिज्ञासा प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व कुतूहल निर्माण करणे, इस्रो सहल माध्यमातून उच्चस्तरीय वैज्ञानिक संस्था व अंतराळ संशोधनाची ओळख करून देणे, निपुण महाराष्ट्र उपक्रमाद्वारे मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान वाढीस प्रोत्साहन, माजी विद्यार्थी मेळावा, दिव्यांग विद्यार्थी क्रीडा स्पर्धांद्वारे सर्वसमावेशक शिक्षणाचा प्रसार तसेच हरित कुंभ उपक्रमांतर्गत पर्यावरण संवर्धन व जनजागृती अशा विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

हे न्यूज लेटर नाशिक महानगरपालिका आयुक्त श्रीमती मनीषा खत्री व अतिरिक्त आयुक्त अमित रंजन यांच्या प्रेरणेने तसेच प्रशासन अधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाने तयार केले असून विशेष शिक्षक प्रल्हाद हंकारे यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. यावेळी महापौर हिमगौरी आडके यांनी नाशिक महानगरपालिका शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, विविध उपक्रम आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. विद्यार्थ्यांनी या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, तसेच पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश मनपा शाळांमध्ये करून त्यांचे भविष्य उज्ज्वल करावे, असे सांगितले.

# मुक्त विद्यापीठातर्फे वामनदादा कर्डक जीवनकार्य गीत, कविता लेखन स्पर्धा

**नाशिक (प्रतिनिधी): -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी महाकवी वामनदादा कर्डक जीवनकार्य गीत कविता लेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. विद्यापिठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या निर्देशानुसार महाकवी वामनदादा कर्डक यांच्या २२ व्या स्मृतीदिनानिमित्त विद्यार्थ्यांना वामनदादांच्या जीवनाची आणि त्यांच्या साहित्याची ओळख व्हावी, या उद्देशाने ही स्पर्धा आहे.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्यावर आधारित स्वतः मराठी किंवा हिंदी भाषेत लिहिलेले गीत किंवा कविता ग्राह्य धरली जाईल. हे लेखन सुवाच्य अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करून येत्या १५ मेपर्यंत प्रा. विजयकुमार पाईकराव, प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या पत्त्यावर विद्यार्थी टपालाने पाठवू शकतात. विद्यार्थ्यांनी प्रवेशिकेसोबत आपले पूर्ण नाव, शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्राचे नाव, केंद्र क्रमांक आणि कायम नोंदणी क्रमांक (पीआरएन) व स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे अनिवार्य आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे तीन हजार, दोन हजार व एक हजार रुपये, अशी पारितोषिके दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.


## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **एकनाथ पंढरीनाथ शिंदे** यांचा मृत्यू दि. १२/३/२०१७ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली फोरव्हीलर मारुती कार क्रमांक **MH 15 DC 0653** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती माधुरी एकनाथ शिंदे** रा. चेतनानगर, सिडको कॉलनी, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर फोरव्हीलर मारुती कार माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती माधुरी एकनाथ शिंदे**

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **प्रितीश प्रभाकर म्हस्के** यांचा मृत्यू दि. २३/६/२०२३ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली गाडी क्रमांक **MH 15 GZ 1858** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती दिपाली प्रितीश म्हस्के** रा. फ्लॅट नंबर ३, आशापुरा अपार्टमेंट, गीतानगर, म्हसरूळ, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर गाडी माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती दिपाली प्रितीश म्हस्के**

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **संदीप प्रभाकर परांजपे** यांचा मृत्यू दि. १/७/२०१९ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली गाडी क्रमांक **MH 15 GG 1542** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती सुषमा संदीप परांजपे** रा. फ्लॅट नंबर ५, साईप्रेरणा अपार्टमेंट, दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर गाडी माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती सुषमा संदीप परांजपे**

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझा मुलगा **मुकेश विष्णू सूर्यवंशी** (अविवाहित) याचा मृत्यू दि. २५/५/२०१७ रोजी झाल्याने त्याच्या नावावर असलेल्या दोन गाड्या क्रमांक **MH 15 DZ 6164** व **MH 15 CT 1953** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती मंगला विष्णू सूर्यवंशी** रा. ओझरखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक वारस हक्कदार (आई) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती मंगला विष्णू सूर्यवंशी**

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करतो की, माझे वडील **निवृत्ती बळवंत जगळे** यांचा मृत्यू दि. २/५/२०२५ रोजी व माझी आई **मिराबाई निवृत्ती जगळे** हिचा मृत्यू ३०/११/२०११ रोजी व माझा (अविवाहित) भाऊ **सुरज निवृत्ती जगळे** याचा मृत्यू दि.२/२/२०२५ रोजी झाल्याने भावाच्या नावावर असलेली गाडी क्रमांक **MH 15 JC 3097** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्री. सागर निवृत्ती जगळे** रा. मु. पो. जाखोरी, ता. जि. नाशिक वारस हक्कदार (भाऊ) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर गाडी माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्री. सागर निवृत्ती जगळे**

## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ८/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **संदीप त्र्यंबक गिते** यांचा मृत्यू दि. ३/९/२०२५ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेल्या दोन गाड्या क्रमांक **MH 15 GF 9622** व **MH 15 FS 1746** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती रूपाली संदीप गिते** रा. मु.पो. ब्राह्मणवाडे, ता. सिन्नर, जि. नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती रूपाली संदीप गिते**

## महाराष्ट्र शासन,
## सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक

दूरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२

mahapwd.gov.in/https://pay to pwd

**निविदा सूचना क्रमांक/०२/सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता सा. बां. विद्युत विभाग नाशिक दूरध्वनी क्रमांक ०२५३-२५७८०१२ हे खालील संकेतस्थळावर नमूद केलेल्या बी-१ नमुन्यातील निविदा गेट वे पेमेंट निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून निविदा मागवीत आहेत.

वरील निविदेत ५ कामे समाविष्ट असून या निविदेवरील संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे.

www.mahapwd.gov.in
https://paytopwd.com

या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी नोंद घ्यावी.

जा. क्र. काअना/निविदा-२/७७६/सन २०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा. बां. विद्युत विभाग, ग्रीन बिल्डिंग,
२ रा मजला, उंटवाडी रोड, सा. बां. परिसर,
नाशिक.
E-mail - elnashik.ee@mahapwd.gov.in
दिनांक :- ३०/०४/२०२६

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विद्युत विभाग, नाशिक**

जा. क्र. जिमाका-नाशिक ६४/२०२६-२७
जिल्हा माहिती कार्यालय, वकीलवाडी, नाशिक,
दिनांक :- ७/५/२०२६

# संपादकीय

## नाराजीचा फटका

पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ' तृणमूल काँग्रेस 'चा गड उद्ध्वस्त करण्यात भारतीय जनता पक्षाला अखेर आलेले मोठे यश आणि तमिळनाडूत पहिल्यांदाच रिंगणात उतरलेला अभिनेता विजय याने द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) आणि अण्णा द्रमुक या द्रविडी पक्षांच्या राजकारणाचा आजवरचा 'पॅटर्न' बदलून सत्तेपर्यंत मारलेली मजल. या आहेत पाच राज्यांतील निकालातून पुढे आलेल्या दोन ठळक घटना. आसाममध्ये भाजपची विजयाची हॅट्ट्रीक, पुदुचेरीत युतीद्वारे राखलेली सत्ता आणि केरळमध्ये डाव्या आघाडीचा पराभव करून काँग्रेसप्रणित आघाडीने मिळवलेला विजय हे निकालही तितकेच महत्त्वाचे; परंतु पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू या राज्यांत ऐतिहासिक सत्तांतर होत असल्याने हे विजय झाकोळले गेले. बंगालमधील ममतांचा पराभव आणि देशाच्या दक्षिण ध्रुवावर झालेला दलपती विजय नामक नव्या 'जननायका'चा उदय राष्ट्रीय राजकारणावर नक्कीच परिणाम करणारा आहे. कधी काळी डाव्यांचा गड मानला जाणाऱ्या पश्चिम बंगालच्या गडावर भगवा फडकावून भाजपने दीर्घ काळापासूनचे स्वप्न साकारले; तर केरळमधील पराभवाने उरलीसुरली राजवट गमावल्याने डाव्या पक्षांच्या लाल बावट्याचे देशातील सत्तेच्या राजकारणातून उच्चाटन झाले आहे. एकंदरीत, आसाम आणि पुदुच्चेरीचा अपवाद वगळता बदलाच्या प्रतीक्षेतील मतदारांनी प्रस्थापितांचा पालापाचोळा केला. पश्चिम बंगालच्या निकालांविषयी सर्वाधिक उत्सुकता होती. डाव्या पक्षांची राजवट उलथवून सत्तेवर आलेल्या ममता बॅनर्जी यांनी तीन वेळा आपला बालेकिल्ला शाबूत ठेवला. मात्र, बलाढ्य भाजप आणि केंद्रीय यंत्रणांनी चहूबाजूंनी कोंडी करून या वाघिणीची शिकार केली. राजकीय आघाडीवर आक्रमकपणे लढणाऱ्या ममतांना प्रशासनाचा गाडा हाकण्यात आलेले अपयश, हे त्यांच्या पराभवाचे मोठे कारण. पंधरा वर्षांच्या राजवटीनंतर जनतेमध्ये अत्यंत प्रबळ प्रस्थापितविरोधी भावना होती. त्यांच्या काळात औद्योगिकरण आणि आर्थिक विकास या आघाड्यांवर राज्याच्या पीछेहाटीमुळे तरुणांमध्ये नाराजी होतीच; त्यात शिक्षक भरतीसारख्या घोटाळ्यांचे आरोप आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांची भर पडली. मतदारयादीच्या सखोल पडताळणीमध्ये वगळण्यात आलेली तब्बल ९० लाख नावे, ममतांच्या सल्लागारांवरील छापे आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणांचा बंदोबस्त यांचाही परिणाम निवडणूक निकालावर झाला आहे, हे नाकारता येणार नाही. दुसरीकडे भाजपने घुसखोरी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांवर आक्रमक प्रचार केला. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारात 'झालमुडी'ला वलय मिळवून दिले. तमिळनाडूमध्येही निर्माण झालेली प्रस्थापितविरोधी जनमताची लाट सुपरस्टार विजय याच्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाने आपल्या शिडात भरून घेतली. त्याच्या रूपाने एम. जी. रामचंद्रन आणि जयललिता यांच्यानंतर राज्याला वलयांकित नेतृत्व लाभेल. घराणेशाही आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे नाराजीचा फटका बसून खुद्द मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचाहीही पराभव झाला. विरोधी अण्णा द्रमुकला मतविभागणीचा फायदा करून घेता आला नाही.

## लायन्स क्लब ऑफ लासलगाव यांच्या वतीने नेत्रतपासणी शिबिर




**लासलगाव (भ्रमर वार्ताहर):-** लायन्स क्लब ऑफ लासलगाव प्राईड यांच्या वतीने शरद पाटील यांचे सुशील आय हॉस्पिटल, कल्पतरू लायन्स आय हॉस्पिटल तसेच भावसार ऑप्टिकल्स यांच्या सहकार्याने भव्य नेत्र तपासणी शिबिर भावसार ऑप्टिकल्स येथे उत्साहात संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. युवराज पाटील उपस्थित होते.

या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण ९३ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्र चिकित्सक डॉ. अशमाला शेख यांनी नागरिकांच्या डोळ्यांची सखोल तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच हेमंत भावसार व गिरीश भावसार यांनीही तपासणी कार्यात सहकार्य केले. तपासणीत ४ रुग्ण मोतीबिंदू, एक रुग्ण काचबिंदू, एक रुग्ण कॉर्नियल उपचारासाठी तर ४ रुग्ण प्टेरीजियम समस्येसाठी आढळून आले असून, त्यांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सुवर्णा जगताप यांनी डोळ्यांची नियमित तपासणी ही काळाची गरज असून ग्रामीण भागातील नागरिकांनी अशा शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. युवराज पाटील यांनी बदलती जीवनशैली, वाढता स्क्रीन टाइम व दुर्लक्ष यामुळे नेत्रविकार वाढत असून, वेळेत निदान होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास बापू लचके, संजय बिरार, अर्चना पानगव्हाणे, अझहर पठाण, डॉ. भाग्यश्री सोनवणे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन दीपक जाधव यांनी, प्रास्ताविक संजय डमरे यांनी केले, तर आभार अध्यक्ष हेमंत पवार यांनी मानले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लायन्स क्लब ऑफ लासलगाव प्राईडचे राजाबाबा होळकर, प्रदीप माठा सदस्यांनी परिश्रम घेतले.

## लासलगावमध्ये प्रथमच नेत्रदान; नहाटा कुटुंबीयांचा प्रेरणादायी निर्णय

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर):-** येथील प्रख्यात व्यापारी सुरेशचंद जवानमल नहाटा (वय ६७) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनानंतर नहाटा कुटुंबीयांनी अत्यंत उदात्त भूमिका घेत नेत्रदानाचा निर्णय घेतला असून, लासलगावमधील हे पहिले नेत्रदान यशस्वीरीत्या पार पडले.

घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते आनंदशेठ आबड (किल्लेवाले) यांनी तात्काळ डॉ. राजेंद्र भावसार यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर डॉ. भावसार यांनी नाशिक येथील ख्यातनाम नेत्रशल्यचिकित्सक डॉ. शरद पाटील यांच्या 'सुशील नेत्रपेढी'शी समन्वय साधला. या तातडीच्या हालचालीमुळे नाशिकहून नेत्रपेढीची वैद्यकीय टीम अवघ्या एका तासात लासलगाव येथे दाखल झाली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रदानाची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. या नेत्रदानामुळे दोन गरजू रुग्णांना दृष्टीदानाचा लाभ मिळणार असून, त्यांच्या जीवनात नवा प्रकाश उजाडणार आहे.

या कार्यात डॉ. राजेंद्र भावसार, 'सुशील नेत्रपेढी'चे समन्वयक राहुलदेव जाधव, डॉ. रोहित पाटील, ऋषिकेश जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते ओमप्रकाश राका आणि किरण बरडिया यांचे मोलाचे सहकार्य लाभले. नहाटा कुटुंबीयांच्या या समाजोपयोगी निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, या घटनेमुळे नेत्रदानाबाबत जनजागृतीस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांमुळे दोन अंध व्यक्तींना नवी दृष्टी मिळू शकते. नेत्रदानासाठी कोणताही खर्च येत नाही आणि ही प्रक्रिया अत्यंत सुलभ आहे. इच्छूक आपल्या कुटुंबीयांना नेत्रदानाची इच्छा मृत्यूपूर्वीच सांगावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## आरोग्य विद्यापीठात तुकडोजी महाराज जयंती उत्साहात साजरी




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला तसेच वित्त व लेखाधिकारी बोधिकिरण सोनकांबळे, डॉ. देवेंद्र पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली.

यावेळी संजय मराठे, संदीप राठोड, योगिता पाटील, महेश बिरारीस, वाय.जी. पाटील, दिपक सांगळे, सुरेश शिंदे, राहूल विभांडीक, अजांबर गावंडे, विनायक ढोले, सुदर्शन चक्रवर्ती, जयश्री भालेराव, किशोर गांगुर्डे, सचिन जोशी, नंदन वाघ, रचना काटकर, मनोज वाटाणे, आबाजी शिंदे आदी कर्मचारी उपस्थित होते.

## सुकाकाथ मसाला

### तंगडी

दोन बंगले समोरासमोर होते. एका बंगल्यात एक तरुण मुलगी राहत होती, तर तिच्यासमोरच्या बंगल्यात तरुण राहत होता. त्यामुळे त्या तरुणाने परिस्थितीचा गैरफायदा घ्यायला सुरुवात केली. एकदा त्या तरुणीच्या बापाने हा प्रकार बघितला. तेव्हा तो तावातावाने तरुणाच्या घरी गेला. तेव्हा त्या तरुणाचा बाप तेथे होता. तरुणीच्या बापाने त्याला धमकी दिली, ''पुन्हा जर तुमच्या मुलाने माझ्या मुलीकडे बघितले, तर त्याची तंगडी तोडून हातात देईन.'' त्याचा राग शांत करण्यासाठी मुलाच्या बापाने त्या म्हाताऱ्याला बसायला सांगितले. त्याला चहा दिला. ''तुम्ही कुठल्या गावचे?'' असे विचारून त्याची चौकशी केली. अर्ध्या तासानंतर तो म्हातारा उठला. तेव्हा तो म्हणाला, ''येतो मी; पण तेवढे तंगडीचे मात्र लक्षात ठेवा.' - पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### चिंच-गुळाची चटणी

**साहित्य :-** लिंबाएवढी चिंच, चिंचेच्या दुप्पट गूळ, अर्धी वाटी भाजलेले शेंगांचे दाणे अथवा तीळ, चार-पाच ओल्या मिरच्या, लसणीच्या सात-आठ पाकळ्या, आल्याचा एक इंच तुकडा, चिरलेली कोथिंबीर पाव वाटी.

**कृती :-** चिंच कोळून, कोळलेल्या पाण्यात गूळ घालून विरघळवावा. बाकीचे सर्व साहित्य वाटून, तो गोळा चिंच-गुळाच्या पाण्यात कालवावा. चटणी पातळसर करावी. जेवताना अगर उपाहाराच्या पदार्थाबरोबर ही चटणी चांगली करावी.

**- ऐश्वर्या राजेंद्र काळे**

### सोपे उपाय


- ❑ कोणतीही बर्फी करताना खवा उपलब्ध नसल्यास मिल्क पावडर घालावी. चव खव्याचीच येते.
- ❑ लाडूसाठी रवा किंवा बेसन भाजताना त्यावर दूध शिंपडून भाजावा. छान फुलतो. लाडू खमंगही लागतो.

## रसिका शिंदेच्या फटकेबाज शतकाने नाशिकचा बीडवर मोठा विजय



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय, वरिष्ठ महिलाआमंत्रितांच्या टी-ट्वेंटी साखळी क्रिकेट ( इन्व्हिटेशन लीग ) स्पर्धेत , नाशिक जिल्हा महिला संघाने बीडवर १७४ धावांनी मोठा विजय मिळवला. रसिका शिंदेच्या ५८ चेंडूतील फटकेबाज शतकाने विजयात प्रमुख वाटा उचलला. नाशिकने प्रथम फलंदाजी करत रसिका शिंदेच्या १०० व सलामीच्या तेजस्विनी बाटवालच्या ५३ धावांच्या जोरावर २० षटकांत ३ बाद २०४ धावा केल्या. शाल्मली क्षत्रियने नाबाद २० व प्रचिती भवरने नाबाद १३ धावा फटकवल्या. उत्तरादाखल नाशिकच्या गोलंदाजांसमोर बीडची फलंदाजी १३.३ षटकांत सर्व बाद ३० अशी कोसळली. जान्हवी जाधव, लक्ष्मी यादव व प्रियांका घोडकेने प्रत्येकी २ तर ऐश्वर्या वाघ व ईश्वरी सावकारने प्रत्येकी १ बळी घेत नाशिकला लागोपाठ दुसरा विजय मिळवून दिला. अन्य सामन्यात जालनाने अंबिका वाटाडे ६६ व संस्कृती घोरतले ५२ , यांच्या अर्धशतकांच्या जोरावर इकोले, पुणेवर १३ धावांनी विजय मिळवला. इकोलेच्या कर्णधार चिन्मयी बोरफळेने ५४ व श्रुती गीतेने ३७ धावा केल्या. सी डी एने कर्णधार नीती आगरवालच्या ५९ धावा व २ बळी या कामगिरीच्या जोरावर सातारावर ६९ धावांनी विजय मिळवला. सातारच्या रिद्धी कदम व समृद्धी बनावणे यांनी प्रत्येकी ३१ धावा केल्या.

## भ्रमर शब्दकोडे क्र. ४३४



**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती
२६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव १७) एक म्हण-** तशी माती १८) भारतीय क्रिकेट टीममधील एक माजी फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उष:काल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप
३१) रास उलट लिहा ३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे
३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक ३७) दुर्ग, किल्ला
३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा
४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत) ४५) राजाचे निवासस्थान
४६) बे दुणे

### शब्दकोडे क्र. ४३३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | क्ष | य्य | तृ | ती | या | | प्र | ता | प | ग | ड |
| मि | | | | र | न | | का | स | व | | ब |
| ता | प | मा | न | | | वे | श | | न | व | ल |
| भ | | ल | ग | त | | त | | फ्री | | न | |
| ब | द | क | | स | द | न | | | भ | | क |
| च्च | | | बा | वी | स | | ए | अ | र | टे | ल |
| न | थ | | द | र | | ना | का | | त | न | |
| | क | मा | ल | | द | ल | द | ल | | | मं |
| ज | बा | न | | सा | ग | | शी | त | ल | | ग |
| का | की | | रा | य | डू | | | | स | र | ळ |
| त | | स | म | | शे | त | क | री | | द | वा |
| | द | हा | | सा | ठ | | द | म | ण | | र |

## कुशावर्त कुंडात निर्जंतुक पाणी; विश्वराज फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** विश्वराज एन्व्हायर्नमेंट लिमिटेडची उपकंपनी असलेल्या विश्वराज फाउंडेशनने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणासोबत कुशावर्त कुंड येथे लाखो भाविकांना स्वच्छ, निर्मळ आणि निर्जंतुक पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार केला.

त्र्यंबकचे कुशावर्त कुंड हे अत्यंत धार्मिक महत्त्वाचे स्थळ असून गोदावरी नदीच्या पवित्र उगमस्थानाच्या प्रतीकात्मक स्वरूपामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वर्षभर लाखो भाविक त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन घेण्यापूर्वी येथे पवित्र स्नान करतात, त्यामुळे हे नाशिकमधील सर्वाधिक भेट दिल्या जाणाऱ्या स्थळांपैकी एक बनले आहे. या भागीदारीद्वारे विश्वराज फाउंडेशनचे उद्दिष्ट भाविकांना दिवसाचे २४ तास स्वच्छ आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देत ही पवित्र परंपरा सुरक्षित आणि सन्मानपूर्वक पार पाडता यावी, हे सुनिश्चित करणे आहे.

या भागीदारीबाबत बोलताना विश्वराज एन्व्हायर्नमेंट लिमिटेडचे न्यू इनिशिएटिव्हज विभागाचे संचालक सारंग अरुण लखानी म्हणाले, भारतामध्ये पाणी ही केवळ मूलभूत गरज नाही, तर ते श्रद्धा, संस्कृती आणि सामुदायिक जीवनाशी अतिशय घट्टपणे जोडलेले आहे. या उपक्रमाद्वारे आम्ही केवळ स्वच्छ आणि सुरक्षित पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करत नाही, तर लाखो भारतीयांसाठी अत्यंत सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या या अनुभवाचे पावित्र्य जपण्यास मदत करत आहोत. ही भागीदारी शाश्वतता, सार्वजनिक सेवा आणि सांस्कृतिक जतन यांचा संगम साधत देशभरातील समुदायांसाठी दीर्घकालीन परिणाम निर्माण करण्याच्या आमच्या बांधिलकीला अधिक बळकटी देते.हा उपक्रम विराज फाउंडेशनच्या '४पी' मॉडेल ह्न सार्वजनिक, खाजगी, भागीदारी आणि लोक ह्न द्वारे मोजता येण्याजोगा सामाजिक परिणाम निर्माण करण्याच्या व्यापक तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब आहे. आपल्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत फाउंडेशन महिला, युवक आणि विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास केंद्रे चालवते, ज्यामध्ये संगणक प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश, शिवणकाम, स्टिचिंग आणि ब्युटी सेवा यांचे प्रशिक्षण देऊन उपजीविकेस मदत केली जाते. तसेच पाणी संवर्धन, सार्वजनिक सुरक्षा आणि सामुदायिक सहभाग यांवर आधारित विविध सामाजिक उपक्रम राबवून शाश्वत आणि विस्तारक्षम मॉडेल उभे केले जात आहे.

## लाइफ इन्शुरन्स उद्योगाकडून नवीन उद्योग प्रीमियममध्ये १५.७ टक्के वाढ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** जीवन विमा उद्योगाने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये जोरदार गती नोंदवली असून त्यात एकूण नवीन व्यवसाय प्रीमियम आर्थिक वर्ष २०२५ मधील ३,९७,३३७ कोटी रूपयांच्या तुलनेत वार्षिक १५.७ टक्क्यांनी वाढून ४,५९,७१३ कोटी रूपयांवर पोहोचला.उद्योगाने मार्च २०२६ या महिन्यासाठी नवीन व्यवसाय प्रीमियममधून ७५,८७२ कोटी रूपये गोळा केले. त्यात मार्च २०२५ मधील ६१,४३९ कोटी रूपयांच्या तुलनेत मोठी वाढ दिसून आली असून वैयक्तिक व समूह या दोन्ही विभागांमध्ये मागणी कायम असल्याचे अधोरेखित करते.

ही वाढ प्रामुख्याने समूह व्यवसाय विभागामुळे झाली. त्याने एकूणच विस्तारात मोठे योगदान दिले. समूह एकल प्रीमियम वार्षिक १७.५ टक्क्यांनी वाढून २,४९,७६६ कोटी रूपयांवर पोहोचला, तर समूह वार्षिक नूतनीकरणक्षम प्रीमियममध्ये ३९.० टक्क्यांची भरीव वाढ दिसून आली. समूह बिगर-एकल प्रीमियमनेही पाया कमी असला तरी मोठी वाढ नोंदवली.

वैयक्तिक विभाग स्थिर राहिला. त्यातून स्थिर रिटेल सहभाग दिसून येतो. वैयक्तिक नॉन-सिंगल प्रीमियम १०.१ टक्क्यांनी वाढून

Sabse Pehle
Life Insurance

१,२६,९०० कोटी रूपयांवर पोहोचला, तर वैयक्तिक सिंगल प्रीमियम १२.३ टक्क्यांनी वाढून ५७,६६४ कोटी रूपयांवर पोहोचला. त्यातून दीर्घकालीन बचत आणि संरक्षण उत्पादनांसाठी असलेली सातत्यपूर्ण मागणी दिसून येते.

पॉलिसी जारी करण्याबाबत उद्योगाने आर्थिक वर्ष २०२६ दरम्यान २.८३ कोटींहून अधिक पॉलिसी जारी केल्या. ही मागील वर्षाच्या तुलनेत ४.७ टक्के वाढ आहे. पॉलिसी संख्येच्या तुलनेत प्रीमियममधील ही तुलनेने जास्त वाढ सरासरी विक्रीत झालेली वाढ अधोरेखित करते. ते सुधारित उत्पादन मिश्रण आणि आर्थिक नियोजनाचे साधन म्हणून जीवन विम्यावरील वाढत्या ग्राहक विश्वासाकडे निर्देश करते.

''आर्थिक वर्ष २०२६ मधील जीवन विमा उद्योगाची दमदार कामगिरी ही भारतीय कुटुंबांमध्ये वाढणारी जागरूकता आणि नियोजित आर्थिक संरक्षणाकडे होणारा हळूहळू बदल दर्शवते. वाढीची १५.७% टक्केवारी उत्साहवर्धक असून, त्यातून वाढलेली संरक्षण जागरूकता, व्यापक वितरण पोहोच आणि उत्पादनांमधील सातत्यपूर्ण नावीन्य यांच्या एकत्रित परिणामावर प्रकाश टाकतो. समूह व्यवसाय वेग देत असला तरी वैयक्तिक विभागांमधील स्थिर विस्तार विशेषतः उत्साहवर्धक आहे. तथापि, संरक्षणातील मोठी तफावत जागरूकता वाढवण्याची आणि लवकर स्वीकार करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित करते. विमा जागरूकता समिती म्हणून आमचे सातत्यपूर्ण लक्ष देशभरात आर्थिक लवचिकता मजबूत करण्यासाठी जीवन विम्याबद्दल शाश्वत जागरूकता वाढवणे, समज सुधारणे आणि लवकर स्वीकार करण्यास प्रोत्साहन देण्यावर आहे,'' असे इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ) चे अध्यक्ष कमलेश राव म्हणाले.

***कोलकाता (भ्रमर वृत्तसेवा):-** भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांची कोलकात्याच्या बाह्य भागात अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर काही तासांतच घडलेल्या या घटनेमुळे राजकीय वातावरण तापले असून परिसरात तणाव निर्माण झाला आहे.



दैनिक भ्रमरच्या वर्धापन दिनानिमित्त संपादक चंदुलाल शाह यांना शुभेच्छा देताना आ. सुहास कांदे, अशोका बिल्डकॉनचे संचालक अशोक कटारिया, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त सौ. चित्रा कुलकर्णी, नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मनीषा खत्री, ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत.



महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. जयंत जायभावे, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके, मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, ॲड. दिपक पाटोदकर, फ्रावशी ग्रुप ऑफ स्कूल्सचे संचालक रतन लथ, डॉ. प्रदीप पवार, पश्चिम प्रभाग सभापती सुरेश पाटील, शिवसेनेचे उपनेते अजय बोरस्ते, नगरसेवक राजेंद्र आहेर, ज्येष्ठ विधिज्ञ नंदकिशोर भुतडा.



नगरसेविका इंदुबाई नागरे, नगरसेवक प्रवीण तिदमे, नगरसेवक गुरमित बग्गा, माजी महापौर विनायक पांडे, नगरसेविका कविता नाईक, नगरसेविका योगीता हिरे, नगरसेविका नीलम पाटील, नगरसेविका अदिती पांडे, नगरसेविका पल्लवी गणोरे, नगरसेविका डॉ. हेमलता पाटील.



ललित रुंगटा ग्रुपचे संचालक अभिषेक बुवा, मार्केटिंग हेड रोहित राजपूत, भाजप गटनेते ॲड. श्याम बडोदे, नगरसेवक हेमंत शेट्टी, मनपाचे उपायुक्त अजित निकत, नरेडकोचे माजी अध्यक्ष सुनील गवादे, नरेडकोचे माजी अध्यक्ष जयेश ठक्कर, शिल्पा इस्टेटचे संचालक भाविक ठक्कर, नरेडकोच्या पदाधिकारी रचिता लड्ढा, नगरसेवक चंद्रकांत खोडे.



उद्योजक विक्रम सारडा, ठक्कर डेव्हलपर्सचे संचालक जितूभाई ठक्कर, नरेंद्र ठक्कर, भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार, नाना शिलेदार, सुनील देसाई, उत्तम उगले, कर सल्लागार शैलेश शाह, कर सल्लागार नितिन फिरोदिया, के.के.वाघ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अजिंक्य वाघ.



महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, वासुदेव भगत, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे, माजी नगरसेवक तानाजी जायभावे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे, भाजपचे ज्येष्ठ नेते प्रवीण पवार, मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. आवेश पलोड, बांधकाम व्यावसायिक अविनाश शिरोडे, नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष धनपाल शहा, सचिव समीर रकटे.



हॉटेल एसएसकेचे संचालक शैलेश कुटे, भाजपचे नेते राहुल गणोरे, नाशिक जिमखानाचे अध्यक्ष नरेंद्र छाजेड, सचिव शेखर भंडारी, नवजीवन एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संस्थापक सुभाष देशमुख, मिसेस ग्लोबल युनायटेड एलिट लाइफ टाइम क्वान नमिता कोहोक, प्रजापती ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाच्या पंचवटी शाखाप्रमुख पुष्पादीदी, सावानाचे उपाध्यक्ष डॉ. सुनील कुटे, ज्ञानवर्धिनी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव गोपाळ पाटील, ॲड. अंजली पाटील.



पुणे विद्यार्थी गृहाचे उपकार्याध्यक्ष अमोल जोशी, डॉ. पार्थ देवगावकर, सेवानिवृत्त सनदी अधिकारी भाऊसाहेब धीवरे, देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या माजी नगरसेविका प्रभावती धीवरे, नाशिक सायकलिस्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष अमित घुगे, उपाध्यक्ष दविंदरसिंग भेला, पदाधिकारी सुरेश डोंगरे, सा. बां. विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता सुनील बाफना, प्रवीण रौंदळ, बाजीराव सोनवणे.



ऋतुराज पांडे, किमया बागूल, नामको बँकेचे संचालक देवेंद्र पटेल, डॉ. प्रदिप गोंधळे, नॅबचे सचिव मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, शशांक हिरे, सुरेश पोतदार, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त मंगलसिग सूर्यवंशी, ज्येष्ठ साहित्यिक मिलींद चिंधडे, सौ. मुक्ता चिंधडे.



माजी नगरसेवक उल्हास धनवटे, पत्रकार विश्वास मदाने, चैताली शिंदे, शर्मिद्र शिंदे, सौ. मंगला पाटील, डी. एस. पाटील, के.के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क अधिकारी प्रसाद जगताप, राजू ठाकरे, संदिप धात्रक, नाना काळे.

# त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट बरखास्त करून नवीन नियुक्ती करण्याची मागणी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** त्र्यंबकेश्वर हे देशभरातीलच नव्हे तर जगभरातील भारतीयांचे अत्यंत पवित्र देवस्थान मानले जाते. ट्रस्टमधील पदाधिकाऱ्यांच्या चुकीच्या वर्तनामुळे तसेच आर्थिक गैरव्यवहार आणि विविध वादग्रस्त घटनांमुळे सध्याचा ट्रस्ट बरखास्त करून नव्या, विश्वासार्ह ट्रस्टची नियुक्ती उच्च न्यायालयाने करावी, अशी मागणी माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

ललिता शिंदे यांनी सांगितले की, वर्षभर लाखो भाविक येथे श्रद्धेने दर्शनासाठी येतात. मात्र मागील काही वर्षांत देवस्थानच्या ट्रस्टच्या कारभारामुळे या पवित्र स्थळाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आपल्या कार्यकाळात त्यांनी देवस्थानातील कथित गैरकारभाराविरोधात नाशिक न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर लढाई लढली आहे. त्यांनी आरोप केला की, २०२३ मध्ये तत्कालीन चेअरमन विकास कुलकर्णी यांनी विश्वस्त निवडीसंदर्भात दिलेल्या पत्राला बाजूला ठेवत धर्मादाय सहआयुक्तांनी मनमानी करून आपल्या मर्जीतील व्यक्तींची नियुक्ती केली.

तसेच ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांच्यावर दर्शनाच्या नावाखाली भाविकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळल्याचा आरोप असून त्यांच्यावर पोलीस गुन्हा दाखल असल्याचेही शिंदे यांनी सांगितले. मार्च २०२६ मध्ये हरियाणातील एका भाविकाला ट्रस्टींकडून मारहाण झाल्याचा प्रकार घडल्याने देवस्थानाची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय ट्रस्टी सत्यप्रिय शुक्ल यांच्यावरही अनेक प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल होऊनही ते पुन्हा पुन्हा ट्रस्टी म्हणून कार्यरत राहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सध्याच्या ट्रस्टमध्ये दहशत, दबाव आणि गैरव्यवहाराचे वातावरण असल्याने भाविकांमध्ये अस्वस्थता निर्माण होत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

आगामी नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिस्थितीमुळे भाविकांपर्यंत चुकीचा संदेश जाऊ नये, तसेच पवित्र कुंभमेळ्याची प्रतिमा बाधित होऊ नये, यासाठी सध्याचा ट्रस्ट बरखास्त करून न्यायालयाच्या देखरेखीखाली पारदर्शक व विश्वासार्ह नवीन ट्रस्ट स्थापन करण्याची मागणीही शिंदे यांनी केली आहे.

## आजचे वाढदिवस


राजन दलवाणी, उद्योजक


जयश्री खर्जुल, माजी नगरसेविका


महेश कांबळे, समाजसेवक


प्रशांत गवळी, सामाजिक कार्यकर्ते


सुहास गडाख, अध्यक्ष, शिवमुद्रा प्रतिष्ठान


गणेश शेवरे, पत्रकार


प्रसाद जामखिंडीकर

संजय नागरे, ज्योतिषी

# नादब्रह्मने केला संगीतमय मराठीचा जागर



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** येथील नादब्रह्म या संस्थेने हर्ष–राज सभागृहात मराठीचा संगीतमय जागर केला. यात विविध प्रकारची मराठी गाणी सादर करण्यात आली.

हर्षद शिंत्रे आणि राजेश दाणी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सूर नवा ध्यास नवा या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष, वरिष्ठ फौजदारी वकील अविनाश भिडे यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात हर्षद शिंत्रे यांनी नादब्रह्मचे संकल्प आणि भावी उपक्रमांबद्दल माहिती दिली. ॲड. भिडे यांनी आपल्या भाषणात, संगीतामध्ये गट–तट असू नये. सर्व कलाकारांनी कलेची आराधना या एकाच ध्येयाने एकत्र येऊन संगीत साधना करावी, असे आवाहन केले. तसेच नादब्रह्मच्या उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी विशेष अतिथी गायिका अदिती कुलकर्णी यांची गाणी आणि समीर कुलकर्णी यांनी शिटीवर सादर केलेली गाणी हे विशेष आकर्षण ठरले. सर्वांच्या आग्रहाखातर ॲड. अविनाश भिडे यांनीही एक गाणे सादर केले.

यावेळी अनिल कुलकर्णी, भूषण कुलकर्णी, उल्हास भसे, स्वराज ताडे, स्वानंद पारखी, अतुल कुलकर्णी, सुजाता देव, सुनीता साठे, शुभांगी कुलकर्णी यांनी गाणी सादर केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रेवती वाघमारे, रणजित कोल्हटकर आदींनी परिश्रम घेतले.

# स्नेह मेळाव्यातून सामाजिक एकतेचा संदेश

## नेहरूनगर प्रेस कामगारांच्या वारसांचा उत्साहात मेळावा



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–**नेहरूनगर येथील प्रेस वसाहतीतील कामगारांच्या वारसांचा स्नेह मेळावा व्हॉलीबॉल कोर्ट मैदानावर उत्साहात पार पडला. माझं नेहरूनगर परिवारतर्फे आयोजित या मेळाव्यात सामाजिक ऐक्य, संस्कार आणि महापुरुषांच्या विचारांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर अशोक दिवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजमाता जिजाऊंचे वंशज शिवाजीराजे जाधव उपस्थित होते. तसेच प्रेस मजदूर संघाचे सरचिटणीस जगदीश गोडसे, छावा संघटनेचे अध्यक्ष विलास पांगारकर, टोकियो ऑलिम्पिक निरीक्षक अशोक दुधारे, मनपाचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. मार्गदर्शन करताना शिवाजीराजे जाधव यांनी देशाच्या आर्थिक जडणघडणीत प्रेस कामगारांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. स्नेह, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी जपत महापुरुषांच्या आदर्शातून नवा समाज घडविण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात माजी महापौर अशोक दिवे यांनी नेहरूनगर या कामगार वस्तीचे शहरावर मोठे ऋण असल्याचे सांगितले.

या परिसरातून घडलेल्या पिढ्यांनी नैतिक मूल्यांची जपणूक करत आदर्श निर्माण केल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रेस कामगारांशी संबंधित नूतन नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये प्रमिला मैंद, आशा तडवी, प्रशांत दिवे, सुनीता भोजने, कैलास मुदलियार, राहुल दिवे, सतीश निकम, शैलेश ढगे, पूजा नवले आणि ज्योती जोंधळे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक नितीन चंद्रमोरे यांनी केले. यावेळी सुरेश निकम, कोविड योद्धा गौतम पगारे, बाळासाहेब गायधनी, राजू ढगे, राजू उन्हवणे, निखिल शिंदे, राजेश वाघ, संजय गांगुर्डे, नितीन काळे, दीपक शेजवळ, अनवर तडवी, अनिल साळवे, विलास सोनवणे, शैलेश जगताप, सुनील ओढेकर, नाना ढवळे, सुनील साळवे, कमलाकर जाधव आदी उपस्थित होते. मेळाव्यानिमित्त आयोजित सुगम संगीत कार्यक्रमालाही उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

# सुविनय दामले यांचे रविवारी व्याख्यान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथील जनस्थान सेवा मंडळ व कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघ, यांच्या संयुक्त विद्यमाने निरोगी जीवनाचा मूलमंत्र सांगणारे कुडाळ, सिंधुदुर्ग येथील वैद्य, राष्ट्रीय आयुर्वेद गुरु सुविनय दामले याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

हे व्याख्यान रविवारी (दि.१०) सायंकाळी ५. ३० वाजता कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रांगणात होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन नगरसेवक अजिंक्य साने यांनी केले आहे.

# चतु:शाखीय ब्रह्मवृंद गायरान ट्रस्टतर्फे संध्या प्रशिक्षण शिबीर

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** येथील चतु:शाखीय ब्रह्मवृंद गायरान ट्रस्ट नाशिकतर्फे दरवर्षीप्रमाणे शनिवार दि. ९ ते शुक्रवार दि.१५ मे या कालावधीत रोज सायंकाळी ५ वाजता श्री गोपाल मंगल कार्यालय, सरदार चौक, पंचवटी येथे विनामूल्य संध्या प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण वर्गात वे.शा.सं.डॉ. नरेशशास्त्री पुजारी गुरुजी मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी संस्थेचे कार्यालय गोपाल मंगल कार्यालय सरदार चौक पंचवटी येथे संपर्क साधून व्यवस्थापक जितेंद्र कुलकर्णी (दूरध्वनी क्र. ९८९०६०४६८१/ ९६९९०८५५७६) यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन अध्यक्ष मोहन रानडे, कार्यवाह हेमंत कुलकर्णी, खजिनदार प्रमोद गर्गे आणि विश्वस्त ॲड. मनोहर पुजारी, सुभाषचंद्र जोशी, ॲड अविनाश भिडे, ॲड. अजिंक्य साने, सुधीर कावळे, सी.ए. निशांत कुलकर्णी यांनी केले आहे.

# गळ्याला चाकू लागल्याने एकाचा मृत्यू

**नागपूर (भ्रमर वृत्तसेवा) :–** बारमध्ये दोन कर्मचाऱ्यांमधील मस्करी ही थेट एकाच्या जीवावर बेतली. बारटेंडरने फेकलेला चाकू तेथील कॅशिअरच्या गळ्याच्या खाली घुसला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. सिताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. अवधेश कुमार (वय २६, रा. रायबरेली, उत्तरप्रदेश) असे मृताचे नाव आहे. तो टोकियो बारमध्ये कॅशिअरचे काम करत होता. तर आरोपी आयुष नेगी (वय २४, रा. उत्तरांखड) हा तेथे बारटेंडर आहे. बारटेंडर आयुषने लिंबू कापण्याचा व बंद असलेला चाकू अवधेशच्या दिशेने फेकला. तो चाकू उघडला आणि अवधेशच्या गळ्याच्या खाली घुसल्याने त्याचा मृत्यू झाला.

# पुण्यात विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या स्पर्धेसाठी ४१ संघ सहभागी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो–खो व बास्केटबॉलच्या क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. या स्पर्धा बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडत आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १० राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल ४१ संघ सहभागी झाले आहेत.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत. कबड्डी, कुस्ती, खो–खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघांत लढत होत आहे. तर कबड्डी व खो–खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील १८ संघ, तर खो–खोसाठी ९ संघ सहभागी आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी सात संघांमध्ये लढती सुरू आहेत.

विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या मुख्य उपस्थितीत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते झाले.

यावेळी राज्याच्या क्रीडा आयुक्त शीतल तेली–उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच महावितरण, महानिर्मिती, महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळासह अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे अध्यक्ष जिग्नेश राय, सरचिटणीस नरेश कुमार यांची विशेष उपस्थिती होती.

आज (दि. ८) सायंकाळी ५ वाजता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार (महापारेषण) व राधाकृष्णन बी. (महानिर्मिती) यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनात या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पुणे प्रादेशिक संचालक सुनील काकडे, तसेच उपाध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता अनिल कोलप (महापारेषण) व अधीक्षक अभियंता अशोक घाडगे (महानिर्मिती) आणि मुख्य समन्वयक म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके (महावितरण) व पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती) आणि विविध समितीचे प्रमुख व सदस्य कार्यरत आहेत.

# आजपासून थॅलेसेमिया जनजागृती सप्ताह

## जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने विविध कार्यक्रम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** ८ मे जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने थॅलेसेमिया जनजागृती अभियान सप्ताह राबविण्यात येणार आहे.

या सप्ताहात थॅलेसेमिया जनजागृती अभियान अंतर्गत विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आज सायंकाळी ६ वाजता पंचवटी येथे महागोदाआरती, सिटीसेंटर मॉल थॅलेसेमिया जनजागृती या विषयावर पथनाट्य सादरीकरण करण्यात येणार आहे.

उद्या (दि. ९) सकाळी १० वाजता फ्रावशी टाऊन अकॅडमी कॉलेजरोड येथे थॅलेसेमिया बालकांसाठी धमाल, मजा, मस्ती तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या थॅलेसेमिया बालकांचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. तर दुपारी ४ वाजता जनकल्याण रक्तकेंद्र येथे थॅलेसेमिया बालकांसाठी विशेष थॅलेसेमिया क्लिनिक सुरु करण्यात येणार आहे.

रविवारी (दि. १०) सायंकाळी ६ वाजता इस्कॉन श्री श्री राधामदन गोपाळ मंदिर द्वारका येथे थॅलेसेमिया बालकांच्या हस्ते महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. थॅलेसेमिया डे निमित्त आयोजित सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमास थॅलेसेमिया बालकांनी व पालकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष राजेश रत्नपारखी, कार्यवाह शैलेश पंडित यांनी केले आहे.

१८० थॅलेसेमिया बालकांसाठी जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने ३८९० रुपये किंमतीच्या आरोग्य तपासण्या मोफत करण्यात येणार असून यामध्ये सीबीसी रक्ताच्या चाचण्या, टूडी इको, किडनी फंक्शन टेस्ट, लिव्हर फंक्शन टेस्ट, टोटल आयर्न बाइंडिंग कॅपॅसिटी (टीआयबीसी) चाचणी, सीरम फेरिटिन चाचणी, डोळे, कान, दंत तपासणी मोफत करण्यात येणार आहे, अशी माहिती जनकल्याण रक्तकेंद्राचे कार्यवाह शैलेश पंडित यांनी दिली.

# कार झाडावर आदळल्याने एकाचा मृत्यू, दोघे जखमी

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** देवळा–नाशिक रस्त्यावर भावडे फाट्यानजीक झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले आहे.




देवळा पोलीस ठाण्यात मोटार अपघाताची नोंद करण्यात आली आहे. याबाबत पोलीस ठाण्याकडून मिळालेली माहिती अशी की, देवळ्याहून नाशिकच्या दिशेने जात असलेली कार आय २० ( क्र. एम एच ४७ डब्लू ६३३६) ही भावडे फाट्यावर झाडावर जाऊन आदळली. यात कारमधील शुभम संदीप शेलार (वय ३०) हा तरूण जागीच ठार झाला तर मंदार गजमल सावंत (वय ३५), वैभव सुभाष गंभीरे (वय ३०, रा. कल्याण) हे दोन्ही गंभीर जखमी झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिकला दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त या कारमधील तिघे जण तालुक्यातील माळवाडी येथे मित्राच्या लग्नाच्या मांडवासाठी आले होते.

मयत शुभम संदीप शेलार याच्यावर देवळा ग्रामीण रुग्णालयात छवविच्छेदन करण्यात येऊन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या दुर्दैवी घटनने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी पोलीस करीत आहेत.

# राज्यातील षंढाचे भाजपा सरकार: खा. संजय राऊत



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** देशातील निवडणुकीच्या माध्यमातून बहुमत मिळवित भाजपा हे गुलामगिरीचे वर्चस्व गाजवत आहेत. पश्चिम बंगाल आता गुजरात करून ठेवतील, असे सांगत शिवसेना उबाठा गटाचे खा. संजय राऊत यांनी भाजप नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत.


खा. संजय राऊत नाशिक येथे आले असता शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, नरेंद्र मोदी हुकूमशहा झाले असून या त्यांच्या पक्षातील सर्व मंत्री हे षंड आहेत. पहलगाम येथील घटनेनंतर पाकिस्तानचा पूर्ण बदला घेतलेला नसतानाही केवळ ट्रम्प यांच्या दमदाटीमुळे पंतप्रधान मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर मागे घेतले असा आरोप राऊत यांनी केला.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या जमिनीचे अधिगृहण करताना दंडेलशाहीचा वापर करीत महिलांना देखील कपडे फाडून मारहाण केली जात आहे. यासंदर्भात मारहाण झालेल्या महिला व पुरुष संजय राऊत यांच्या भेटीला आले होते. पोलीस व अधिकाऱ्यांकडून झालेल्या मारहाणीच्या जखमा दाखवत असताना राऊत म्हणाले की, सिंहस्थासाठी धर्म ध्वज उभारणीकरिता आलेल्या या मंत्र्यांना या गोष्टी कळत नाही का? हीच का त्यांची धर्मध्वजा. धर्म ध्वजेचे नाटक काय करतात असा सवाल करीत खा. राऊत म्हणाले की, शहराच्या विकास कामात खासदार, लोकप्रतिनिधी कोणालाही विश्वासात घेतले जात नाही. मंत्र्यांनी केवळ वसुलीसाठी अधिकारी नेमले असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

हाच प्रश्न आपण हातात घेतला असून जमीन अधिग्रहण वादातून झालेली मारहाण करणारे अधिकारी हे परप्रांतीय आहे. केवळ एका मंत्र्याच्या सांगण्यावरून त्यांना येथे वसुलीसाठी नेमण्यात आले आहे. याची चौकशी व्हावी, अशी आपली मागणी असल्याचे ते म्हणाले. भाजपा हा शंढ लोकांचा पक्ष असून गुलामगिरीत काम करणारे आहेत. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे नेते रवींद्र मिर्लेकर, दत्ता गायकवाड, माजी आमदार वसंत गिते, जिल्हाध्यक्ष डी. जी. सूर्यवंशी, मनपा गटनेता केशव पोरजे, रवी वर्मा, निलेश साळुंके आदी उपस्थित होते.

# इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या रस्त्यावरच गाडी पार्क केल्याने काचा फोडून नुकसान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** इंदिरानगर येथील पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर पार्क केलेल्या चारचाकी वाहनाच्या काचा फोडून नुकसान करण्यात आले.



बुधवारी (दि.६) रात्रीच्या वेळेस अज्ञात इसमानी पेठे नगर रोड लगतच्या जाखडीनगर येथील पोलीस ठाण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर घराच्या बाहेर चारचाकी वाहन (क्र. एमएच १५ सीडी ७७६३) उभे केले होते. अज्ञात समाजकंटकांनी रात्रीच्या सुमारास या गाडीच्या काचा फोडून मोठे नुकसान केले आहे.

याबाबत संबंधित पोलीस ठाण्याने दखल घेऊन संबंधितांना अटक करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी गाडी मालक निलेश हडकर यांनी केली आहे.

# विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आज ‘जस्ट मर्सी’ चित्रपटाची मेजवानी

**नाशिक (प्रतिनिधी) :–** विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा जलालपूर, नाशिकतर्फे चित्रपट प्रेमींसाठी सिनेमा कट्टा उपक्रमांतर्गत आज (दि. ८) सायंकाळी ६ वाजता जस्ट मर्सी हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक डेस्टिन डॅनियल क्रेटनआहेत.



हा चित्रपट डिझास्टर मॅनेजमेंट सेंटर ॲण्ड ट्रेनिंग हब, ठाकूर रेसिडेन्सी, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे दाखविण्यात येणार आहे.

कथा तशा नेहमीच्याच. कृष्णवर्णीयांवरील अन्यायाच्या. पण वेगळे हे आहे की, ही या साऱ्या कृष्णवर्णीयांना फाशीची सजा झालेली आहे. अलाबामामधल्या तुरुंगातील फाशी कक्षातले हे कैदी. आपली तारीख केव्हाही ठरेल अशा छायेखाली जगणारे. दक्षिणेतल्या वंशवादी विचारांचे प्रभुत्व असलेले हे राज्य. या सर्वांमधून उठून दिसणारे दोन जण. एक आहे हर्बर्ट रिचर्डसन आणि दुसरा आहे वॉल्टर मॅकमिलियन.

हर्बर्ट हा व्हिएतनाम युद्ध अनुभवलेला सैनिक. युद्धातील भीषण अनुभवांमुळे मानसिक संतुलन गमावलेला. सैरभैर. त्याने खरे तर इस्पितळात असायला हवे. एक दिवस तो एक बॉम्ब बनवतो व कुठेतरी ठेवून देतो. एका मुलीला तो सापडतो आणि तिचा जीव जातो. वॉल्टरच्या गावात एका गोऱ्या मुलीचा निर्घृण खून होतो. वर्षभर त्याचा निष्फळ तपास झाल्यावर एक कुभांड रचले जाते. एक गोरा कैदी वॉल्टरविरुद्ध साक्ष देतो. त्याच्या साक्षीखेरीज इतर सर्व पुरावे नजरेआड केले जातात.

आपल्याला हे सर्व कळते ते ब्रायन स्टीव्हनसन या काळ्या वकिलामार्फत. हार्वर्डमधून पदवी घेतलेला हा वकील आपले आयुष्य दक्षिणेतल्या फाशी कक्षातील कैद्यांसाठी लढण्यात घालवायचे, असे ठरवतो आणि अलाबामात दाखल होतो. चित्रपटाची कहाणी ही ब्रायनने या कैद्यांसाठी केलेल्या तपासाची व लढलेल्या केसेसची कहाणी आहे. आशा निराशा दोन्हींचा अनुभव देणारी.

ही पात्रे काल्पनिक नाहीयत. ब्रायन स्टीव्हनसनच्या आत्मवृत्तावर हा सिनेमा आधारलेला आहे. दिग्दर्शक या नात्याने क्रेटन यांची हाताळणी चांगली असली तरी बऱ्याच प्रमाणात चाकोरीबद्ध आहे. पण चित्रपटातील नटसंचाचा अभिनय वाखाणण्याजोगा आहे. वाट्याला आलेल्या चाकोरीतल्या भूमिकांच्या ते वर उठतात. मायकेल बी. जॉर्डन अभिनीत ब्रायन स्टीव्हनसन, जेमी फॉक्सचा वॉल्टर मॅकमिलियन आणि रॉब मॉर्गनचा हर्बर्ट रिचर्डसन आपापल्या पात्रांची घालमेल उभी करण्यात यशस्वी होतात. टिम ब्लेक नेल्सनचा खोटी साक्ष दिलेला राल्फ मायर्स आणि ब्री लार्सनची ब्रायनची सहकारी इवा ॲन्स्ली यांच्या भूमिका छोट्या असूनही छाप टाकतात. हार्पर लीचे 'टू किल अ मॉकिंगबर्ड' जिथे घडते त्या तिच्याच जन्मगावात घडणाऱ्या घटनांवर आधारित हा सिनेमा आहे.

हा चित्रपट पाहण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वास ठाकूर, डॉ. मनोज शिंपी, ऋचिता महाजन–ठाकूर यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.